निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
बुधवार
०४ फेब्रुवारी २०२६
पाने: ०४ किंमत: २ .००
वर्ष: १५ वे अंक: ३३९ वा

RNI.No.MAH/MAR2011/39247

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. G 2/RNP/AGD-441/2024-26 | मुख्य संपादक- सुग्रीव मुंढे

## लालपरी गायब, ई-बसचा थाट

### पैठण-संभाजीनगर मार्गावर विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भविष्य 'वेटिंग'वर!

**आत्ताच एक्सप्रेस**

**पैठण/प्रतिनिधी/**एकीकडे सरकार 'डिजिटल इंडिया' आणि 'पर्यावरणपूरक' वाहतुकीच्या गप्पा मारत असताना, दुसरीकडे पैठण-छत्रपती संभाजीनगर मार्गावर धावणाऱ्या ई-बस (Electric Buses) ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी डोकेदुखी ठरत आहेत. राज्य परिवहन मंडळाने (MSRTC) या मार्गावरील साध्या बसेस (लालपरी) बंद करून ई-बस सुरू केल्या आहेत, मात्र या गाड्यांमध्ये शैक्षणिक सवलतीचे पासेस ग्राह्य धरले जात नसल्याने विद्यार्थ्यांचे हाल बेहाल होत आहेत. परीक्षेच्या काळात एसटी प्रशासनाच्या या 'प्रयोगामुळे' विद्यार्थ्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

**पासेस असूनही खिशातून पैसे मोजावे लागतात!**

ग्रामीण भागातून हजारो विद्यार्थी उच्च शिक्षणासाठी छत्रपती संभाजीनगरकडे येतात. या विद्यार्थ्यांकडे नियमानुसार शैक्षणिक सवलतीचे मासिक पासेस आहेत. मात्र, या मार्गावर सध्या मोठ्या प्रमाणात ई-बस धावत आहेत. नियमानुसार या बसेसमध्ये सवलतीचे पास चालत नाहीत किंवा विद्यार्थ्यांना चढू दिले जात नाही. परिणामी, खिशात पास असूनही विद्यार्थ्यांना दररोज जास्तीचे पैसे मोजून प्रवास करावा लागतोय किंवा तासनतास साध्या बसची प्रतीक्षा करावी लागतेय.

> प्रशासनाने तात्काळ या मार्गावर पूर्वीप्रमाणे साध्या बसेस (लोकल फेऱ्या) सुरू कराव्यात. जर विद्यार्थ्यांना ई-बसमध्ये प्रवेश नाकारला जात असेल, तर त्या बसेसचा आम्हाला काय उपयोग? लवकरात लवकर तोडगा न निघाल्यास विद्यार्थी रस्त्यावर उतरून आंदोलन करतील.
>
> **- संतप्त विद्यार्थी प्रतिनिधी पैठण**




**प्रशासनाचा गलथानपणा**

**परीक्षेचा काळ अन् मानसिक छळ:** सध्या अंतिम परीक्षांचे दिवस जवळ आले आहेत. अशा वेळी तासनतास बस स्टॉपवर उभे राहिल्यामुळे विद्यार्थ्यांचा वेळ वाया जात असून त्यांच्या अभ्यासावर आणि निकालावर याचा परिणाम होत आहे.

**साध्या बसेस गायब:** पैठण आगाराने या मार्गावरील महत्त्वाच्या ५ साध्या बसेस बंद केल्या आहेत. यामुळे कांचनवाडी, गेवराई तांडा, रेल्वे स्टेशन परिसर या शैक्षणिक हबमध्ये जाणाऱ्या विद्यार्थ्यांची कोंडी झाली आहे.

वेळेचे नियोजन कोलमडले: ई-बसच्या फेऱ्या नियमित नसल्याने आणि साध्या बसेस कमी झाल्याने विद्यार्थ्यांना संध्याकाळपर्यंत बसस्थानकावर ताटकळत बसावे लागते.

**ग्रामीण विद्यार्थ्यांची पायपीट**

कांचनवाडी आणि गेवराई तांडा परिसरात अनेक नामांकित महाविद्यालये आहेत. ग्रामीण भागातील गरीब विद्यार्थी केवळ एसटीच्या पासेसवर अवलंबून असतात. मात्र, ई-बसच्या आगमनामुळे या विद्यार्थ्यांना जणू वाऱ्यावर सोडले गेले आहे. आम्ही शिक्षण घ्यायचे की बसची वाट बघत बसायचे? असा संतप्त सवाल विद्यार्थी विचारत आहेत.

छत्रपती संभाजीनगर मार्गावर तात्काळ किमान ५ ते १० अतिरिक्त साध्या बसेस सुरू कराव्यात. २. ई-बसमध्येही विद्यार्थ्यांना शैक्षणिक सवलतीचे पास वापरण्याची परवानगी द्यावी. ३. सकाळच्या आणि संध्याकाळच्या वेळी 'स्टुडंट स्पेशल' फेऱ्यांचे नियोजन करावे.

## अमोल खुणे यांचे मनोज जरांगे पाटील यांच्यावर गंभीर आरोप

**आत्ताच एक्सप्रेस**

**बीड/प्रतिनिधी/**अमोल खुणे यांनी केवळ मागणीच केली नाही, तर खळबळजनक दावे देखील केले आहेत:

**कोपर्डी प्रकरण आणि पलायन:** २०१६ च्या कोपर्डी प्रकरणातील आरोपींना मारहाण करण्यासाठी मनोज जरांगे यांनीच चिथावणी दिली होती.मात्र, प्रत्यक्ष घटनेच्या वेळी जरांगे स्वतः पळून गेले आणि नंतर हाताला खोटं प्लास्टर लावून फिरत होते,असा दावा खुणे यांनी केला आहे.

**वकील 'मॅनेज' केल्याचा आरोप:** मी तुरुंगातून सुटू नये यासाठी मनोज जरांगे यांनी वकील मॅनेज केले होते, असा थेट आरोप खुणे यांनी केला आहे.

**धनंजय मुंडेंशी संबंधांचा इन्कार:** धनंजय मुंडे यांच्याशी आपला कोणताही संबंध नसून, उलट २०१६ मध्ये जरांगे आणि आपण स्वतः मुंडेंकडे कार्यक्रमासाठी पैसे मागण्यासाठी गेल्याचा खुलासा खुणे यांनी केला.

**सुपारी प्रकरणाचे खंडन:** दादा गरुडसोबतच्या संभाषणात 'सुपारी'चा कोणताही उल्लेख नव्हता. उलट गरुडकडे जरांगे यांच्या विरोधात काही पुरावे असल्याचा दावा त्यांनी केला आहे.

**आत्महत्येचा इशारा आणि कायदेशीर मागणी**

अमोल खुणे यांनी या प्रकरणाचा तपास पूर्ण होईपर्यंत लढत राहण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

**नार्को टेस्टची मागणी:** या संपूर्ण प्रकरणामागे नेमका कोणाचा हात आहे (कोणाचा 'आका' आहे), हे शोधण्यासाठी नार्को टेस्ट आवश्यक असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

**आत्महत्येचा इशारा:** मी हा डाग अंगावर घेऊन मरणार नाही, जर न्याय मिळाला नाही तर मी आत्महत्या करेन, असा टोकाचा पवित्रा खुणे यांनी घेतला आहे.

**पुराव्यांचा दावा:** आपल्याकडे या सर्व गोष्टींचे पुरावे असल्याचा दावा करत त्यांनी पोलिसांना सीडीआर (CDR) तपासण्याचे आवाहन केले आहे. एकेकाळचे सहकारी आता एकमेकांसमोर उभे ठाकले असून, या आरोपांमुळे मराठा आरक्षण आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे.

## संक्षिप्त

### अंबडमध्ये अनधिकृत बांधकामावर नगर परिषदेचा 'हातोडा';बाबासाहेब घोलप यांच्या संघर्षाला यश

**आत्ताच एक्सप्रेस**

**अंबड (जालना)** शहरातील राठी डिपार्टमेंटच्या वतीने सुरू असलेल्या बेकायदेशीर आणि अनधिकृत बांधकामाविरोधात नगर परिषद प्रशासनाने अखेर निर्णायक पाऊल उचलले आहे. या प्रकरणी सातत्यपूर्ण पाठपुरावा करणारे नागरिक श्री. बाबासाहेब लक्ष्मणराव घोलप यांच्या आमरण उपोषणाची दखल घेत, प्रशासनाने संबंधित मालकास ३० दिवसांच्या आत अनधिकृत बांधकाम हटवण्याची नोटीस बजावली आहे. यामुळे शहरात नियमबाह्य बांधकाम करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

अंबड शहरातील प्रसिद्ध 'राठी डिपार्टमेंट'च्या इमारतीचे बांधकाम गेल्या अनेक महिन्यांपासून वादाच्या भोवऱ्यात होते. या बांधकामात नगररचना विभागाच्या नियमांचे सरळसरळ उल्लंघन होत असल्याच्या तक्रारी बाबासाहेब घोलप यांनी प्रशासनाकडे केल्या होत्या. मात्र, प्रशासनाकडून ठोस कारवाई होत नसल्याचे पाहून घोलप यांनी आमरण उपोषणाचा मार्ग स्वीकारला.

तपासणीत धक्कादायक वास्तव समोर

घोलप यांच्या आंदोलनामुळे प्रशासकीय यंत्रणा हलली. नगर परिषदेचे अभियंता आणि बांधकाम विभागाने या इमारतीची सखोल चौकशी केली. बिट मुकादमाच्या अहवालात खालील गंभीर बाबी समोर आल्या आहेत:

मालक रमेश बन्सीलाल राठी यांनी केवळ चार मजली बांधकामाची परवानगी घेतली होती.प्रत्यक्षात, मंजूर नकाशापेक्षा जास्त क्षेत्र व्यापून अतिरिक्त मजल्यांचे बांधकाम करण्यात आले.

हे बांधकाम महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ (MRTP act) च्या कलम ५२ आणि ५३ चे थेट उल्लंघन असल्याचे सिद्ध झाले आहे.

नगर परिषदेचा ३० दिवसांचा 'अल्टिमेटम'प्रशासनाने राठी डिपार्टमेंटला अधिकृत नोटीस बजावली असून त्यात स्पष्ट नमूद केले आहे की,पुढील ३० दिवसांच्या आत अनधिकृत वाढीव बांधकाम संबंधित मालकाने स्वतःहून पाडून टाकावे.मुदतीत बांधकाम न काढल्यास नगर परिषद स्वतः हे बांधकाम जमीनदोस्त करेल.या कारवाईसाठी येणारा सर्व खर्च (हातोडा खर्च) संबंधित मालकाकडूनच वसूल केला जाईल.

प्रशासनाने कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून ठोस कारवाईचे आश्वासन दिल्यामुळे, २६ जानेवारी रोजी बाबासाहेब घोलप यांनी आपले उपोषण मागे घेण्याची तयारी दर्शवली. शहरातील कोणत्याही अनधिकृत बांधकामाची गय केली जाणार नाही, असा कडक इशारा नगर परिषद प्रशासनाने दिला आहे.या कारवाईमुळे अंबड शहरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले असून, कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर असाच वचक निर्माण व्हावा, अशी भावना व्यक्त होत आहे.

## ज्येष्ठ कवी लोकनाथ यशवंत २० व्या विद्रोही मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी/** विद्रोही सांस्कृतिक चळवळीच्या वतीने नांदेड येथे आयोजित केल्या जाणाऱ्या २० व्या विद्रोही मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी नागपूरचे ज्येष्ठ कवी, लेखक आणि अनुवादक लोकनाथ यशवंत यांची एकमताने निवड करण्यात आली आहे. विद्रोही सांस्कृतिक चळवळीच्या राज्याध्यक्षा प्रा. प्रतिमा परदेशी आणि स्वागताध्यक्ष राहुल एस. एम. प्रधान यांनी आज आयोजित पत्रकार परिषदेत ही घोषणा केली.

हे द्विदिवसीय संमेलन २८ फेब्रुवारी आणि १ मार्च २०२६ रोजी नांदेड एज्युकेशन सोसायटीच्या सायन्स कॉलेज मैदानावर संपन्न होणार आहे.

विद्रोही परंपरेचा वारसा

महात्मा जोतिराव फुले यांनी तत्कालीन प्रस्थापित साहित्य संमेलनांच्या विषमतेवर टीका करत विद्रोही विचारांचे बीज रोवले होते. तोच वारसा पुढे नेत १९९९ पासून महाराष्ट्राच्या विविध कानाकोपऱ्यात १९ यशस्वी संमेलने पार पडली आहेत. यापूर्वी बाबुराव बागुल, डॉ. यशवंत मनोहर, डॉ. आ. ह. साळुंखे आणि उर्मिला पवार यांसारख्या दिग्गज साहित्यिकांनी हे अध्यक्षपद भूषवले आहे. आता १९ व्या संमेलनाचे अध्यक्ष डॉ. अशोक राणा (यवतमाळ) यांच्याकडून लोकनाथ यशवंत संमेलनाची सूत्रे हाती घेतील.

लोकनाथ यशवंत: उपरोध आणि परिवर्तनाचा आवाज

लोकनाथ यशवंत हे समकालीन मराठी कवितेतील एक अत्यंत महत्त्वाचे आणि प्रखर नाव आहे. त्यांच्या निवडीबाबत बोलताना प्रा. प्रतिमा परदेशी यांनी काही महत्त्वाचे मुद्दे मांडले:

पाच दशकांचे योगदान: मागील ५० वर्षांपासून ते सातत्याने उपेक्षितांच्या वेदनांना शब्दांत मांडत आहेत.

काव्यशैली: त्यांच्या कवितेतील 'उपरोध' आणि 'आत्मटीका' ही शैली सत्तेच्या दमनकारी यंत्रणेवर प्रहार करणारी आहे.

जागतिक ओळख: त्यांच्या कवितांचे हिंदी आणि इंग्रजीमध्ये अनुवाद झाले असून, त्यांच्या 'बैल' या कवितेवर 'बाईस्कोप' हा चित्रपटही आधारित आहे.

प्रकाशित साहित्य एका दृष्टीक्षेपात

लोकनाथ यशवंत यांची साहित्यसंपदा अत्यंत समृद्ध आहे. कवितासंग्रह:'आता होऊन जाऊ द्या!'आणि शेवटी काय झाले?', 'पुन्हा चाल करू या...', 'बाकी सर्व ठीक आहे...', 'हे तर होणार होते हे'.अनुवादित कार्य: मन्सूर एजाज जोश, निदा फाजली आणि सआदत हसन मंटो यांच्या साहित्याचा त्यांनी मराठीत अनुवाद केला आहे.शैक्षणिक संदर्भ: त्यांच्या कविता अनेक राज्यांच्या शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट असून, त्यावर विद्यापीठीय स्तरावर शोधप्रबंधही सादर झाले आहेत.

आजच्या अघोषित आणीबाणीच्या आणि घटनात्मक मूल्यांवर हल्ला होत असलेल्या काळात, लोकनाथ यशवंत यांच्यासारखा विवेकनिष्ठ कवी संमेलनाचे नेतृत्व करत असणे ही आशादायक बाब आहे. हे संमेलन फुले-शाहू-आंबेडकर प्रणित समतावादी विचारांना नवी ऊर्जा देणारे ठरेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.

## धक्कादायक!

## संभाजीनगरमध्ये 'एमआयएम'चा महापौर बसणार?

### इम्तियाज जलील यांचा मोठा दावा; भाजपची झोप उडाली!

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी/** राजकारणात काहीही होऊ शकतं! माजी खासदार इम्तियाज जलील यांच्या या एका विधानाने छत्रपती संभाजीनगरच्या राजकारणात प्रचंड खळबळ उडवून दिली आहे. महापालिका निवडणुकीत दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष ठरलेल्या एमआयएमने आता थेट महापौरपदावर दावा ठोकण्याची तयारी केली असून, भाजपला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी 'महाआघाडी'चे संकेत दिले आहेत. यामुळे १० तारखेला होणाऱ्या निवडणुकीत मोठा चमत्कार घडण्याची शक्यता निर्माण झाली आहे.भाजप विजयापासून अवघ्या 'एक' पाऊल दूर!संभाजीनगर महानगरपालिकेच्या ११५ जागांपैकी भाजपला ५७ जागा मिळाल्या आहेत. बहुमतासाठी ५८ हा 'मॅजिक फिगर' गाठणे गरजेचे असताना भाजपला केवळ एका नगरसेवकाची उणीव भासत आहे. मात्र, हीच एक जागा भाजपसाठी डोकेदुखी ठरताना दिसत आहे. काय आहे 'इम्तियाज' प्लॅन? भाजपविरुद्ध सर्वपक्षीय घेराबंदी! इम्तियाज जलील यांनी अत्यंत सावध पवित्रा घेत सस्पेन्स वाढवला आहे. भाजपला सत्तेबाहेर ठेवण्यासाठी एमआयएम (३३), एकनाथ शिंदे यांची शिवसेना (१३), उद्धव ठाकरेंची शिवसेना (६), वंचित बहुजन आघाडी (४), काँग्रेस (१) आणि राष्ट्रवादी काँग्रेस-शरद पवार गट (१) या सर्वांना एकत्र आणण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे समजते.गणिताचा खेळ: भाजपविरोधी हे सर्व पक्ष एकत्र आले तर त्यांची एकूण संख्या ५८ होते, जी सत्ता स्थापनेसाठी पुरेशी आहे.राजकीय पेच: शिवसेना एमआयएमसोबत जाणार का?सर्वात मोठा प्रश्न हा आहे की, राज्यातील महायुतीचे समीकरण पाहता एकनाथ शिंदे यांची शिवसेना भाजपची साथ सोडून एमआयएमसोबत जाणार का? जलील यांनी स्पष्टपणे सांगितले आहे की, आमची विविध पक्षांशी चर्चा सुरू असून १० तारखेलाच आम्ही आमचे पत्ते उघडू. भाजपला रोखण्यासाठी कट्टर विरोधक मानले जाणारे शिवसेना आणि एमआयएम एकत्र येणार का, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. नगरसेवकांवर तक्रारींचे सावटविजयाचा जल्लोष सुरू असतानाच एमआयएमच्या ३३ पैकी १६ नगरसेवकांवर टांगती तलवार आहे. कुणाला दोनपेक्षा जास्त अपत्ये, तर कुणी शपथपत्रात चुकीची माहिती दिल्याचा आरोप आहे. या तक्रारींवर जिल्हाधिकारी काय निर्णय घेतात, यावरही बरेच काही अवलंबून असेल.

आता चेंडू जिल्हा प्रशासनाच्या आणि राजकीय रणनीतीकारांच्या कोर्टात आहे. १० तारखेला होणारी निवडणूक ही केवळ महापौर निवड नसून, आगामी विधानसभेची नांदी ठरणार आहे.

**महापालिकेतील पक्षीय बलाबल एका नजरेत:**

| पक्ष | नगरसेवक संख्या |
|---|---|
| भाजप | -५७ |
| एमआयएम (MIM) | -३३ |
| शिवसेना (शिंदे गट) | -१३ |
| शिवसेना (UBT) | -०६ |
| वंचित बहुजन आघाडी | -०४ |
| काँग्रेस | -०१ |
| राष्ट्रवादी (SP) | -०१ |
| **एकूण** | **-११५** |



### जालना ITI मध्ये 'श्रम संस्कारा'चा एल्गार!

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी/**जालना येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत (ITI) आज उत्साहाचे आणि ऊर्जेचे वातावरण पाहायला मिळाले. राष्ट्रीय सेवा योजनेच्या (NSS) वतीने आयोजित सात दिवसीय विशेष श्रम संस्कार शिबिराचे उद्घाटन जालना महानगरपालिकेचया उपायुक्त नंदा गायकवाड यांच्या हस्ते अत्यंत जोशपूर्ण वातावरणात पार पडले. केवळ भाषणापुरते मर्यादित न राहता, या शिबिराची सुरुवात टर्नर विभागाच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या तोफेच्या प्रतिकृतीतून सलामी देऊन करण्यात आली, ज्यामुळे उपस्थितांच्या अंगावर रोमांच उभे राहिले.



**तुमच्या क्षेत्राचे 'किंग' बना: उपायुक्त नंदा गायकवाड**

उद्घाटनपर भाषणात उपायुक्त नंदा गायकवाड यांनी स्वयंसेवकांमध्ये नवा उत्साह भरला. त्या म्हणाल्या, आजच्या स्पर्धेच्या युगात केवळ पदवी मिळवणे पुरेसे नाही. तुम्ही ज्या तांत्रिक क्षेत्रात प्रशिक्षण घेत आहात, त्यामध्ये इतके निपुण व्हा की त्या क्षेत्रात तुमच्यापेक्षा वरचढ कोणीही नसेल. शिबिराच्या माध्यमातून मिळणारे श्रम संस्कार तुम्हाला एक जबाबदार नागरिक बनवतील.

नूतन उपक्रमांची मांदियाळी

हे सात दिवसांचे शिबीर केवळ संस्थेपुरते मर्यादित नसून, याद्वारे जालना शहर आणि परिसराचा कायापालट करण्याचा निर्धार करण्यात आला आहे. उपप्राचार्य श्रीमती आर. एस. शेळके यांनी प्रास्ताविकात शिबिराच्या भव्यतेची कल्पना दिली.

आरोग्य आणि सुरक्षा: सर्वरोग निदान, रक्तदान शिबीर आणि आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण.पर्यावरण आणि स्वच्छता: चंदनझिरा, नागेवाडी आणि संस्था परिसरात व्यापक स्वच्छता अभियान व वृक्षारोपण.कौशल्य आणि प्रबोधन: जिल्हास्तरीय तंत्र प्रदर्शन, महारोजगार मेळावा, महिला सक्षमीकरण व्याख्यान आणि विपश्यना. सामाजिक जनजागृती: पथनाट्यांच्या माध्यमातून समाजातील अनिष्ट रूढींवर प्रहार.

या शिबिरात एकूण ७५ निवडक स्वयंसेवक सहभागी झाले असून, त्यांच्या निवासाची आणि श्रमाची जय्यत तयारी करण्यात आली आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बी. पी. टाक यांनी केले, तर आभार प्रदर्शन ए. एस. बनसोडे यांनी मानले.

यावेळी संस्थेच्या श्रीमती टी. आर. भोपे, एस. एस. कापसे, आर. एस. साळवे, एस. जी. चव्हाण यांच्यासह राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी एस. एन. गिरी, एच. व्ही. सपकाळ आणि संपूर्ण टीम मोठ्या संख्येने उपस्थित होती.जालना आयटीआयने केवळ तंत्रज्ञच नाही, तर समाजभान असलेले तरुण घडवण्याचा जो विडा उचलला आहे, त्याचे कौतुक संपूर्ण शहरात होत आहे.

## जालन्यात बोगस दिव्यांगांचा 'गेम' ओळखून एसटी प्रशासन ॲक्शन मोडवर; ८ जणांवर थेट गुन्हे दाखल होणार!

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी/**शासकीय सवलतींचा गैरफायदा घेऊन एसटीच्या तिजोरीवर डल्ला मारणाऱ्या 'बोगस' दिव्यांगांविरुद्ध जालना आगार प्रशासनाने आता युद्धपातळीवर मोहीम हाती घेतली आहे. गेल्या १० दिवसांपासून सुरू असलेल्या या धडक कारवाईत आतापर्यंत ७ ते ८ जणांचे बोगस कारनामे उघडकीस आले असून, या सर्वांवर आता थेट पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. या कारवाईमुळे बनावट कागदपत्रांच्या आधारे मोफत किंवा सवलतीत फिरणाऱ्यांचे धाबे पुरते दणाणले आहेत.

> खऱ्या दिव्यांग व्यक्तींच्या हक्कावर गदा आणणाऱ्यांची आता खैर नाही. बोगस प्रमाणपत्र वापरणे ही शासनाची आणि समाजाची शुद्ध फसवणूक आहे. अशा व्यक्तींवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.
>
> **- सहायक आगार प्रमुख, जालना.**

अनेकजण धडधाकट असूनही केवळ एसटी प्रवासात सवलत मिळवण्यासाठी बनावट दिव्यांग प्रमाणपत्रांचा (वन-फोर्थ सवलत) वापर करत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. याची गंभीर दखल घेत एसटी महामंडळाच्या आदेशानुसार जालना बस स्थानक प्रमुखांच्या नेतृत्वाखाली विशेष तपासणी पथके तैनात करण्यात आली आहेत.

तपासणीचा 'धडाका': ८० जणांची चौकशी, ८ प्रमाणपत्रे जप्त गेल्या १० दिवसांत जालना आगार आणि चालत्या बसमध्ये ही मोहीम राबवण्यात आली.एकूण तपासणी: सुमारे ७० ते ८० संशयास्पद प्रवाशांच्या प्रमाणपत्रांची कसून चौकशी झाली.बोगसगिरी उघड: तपासणी दरम्यान ८ प्रवाशांकडे बनावट प्रमाणपत्रे असल्याचे निष्पन्न झाले.

तात्काळ कारवाई: प्रशासनाने ही सर्व बनावट प्रमाणपत्रे जागीच जप्त केली आहेत.

**फसवणूक करणाऱ्यांना पोलिसांचा दट्ट्या बसणार!**

केवळ प्रमाणपत्र जप्त करून प्रशासन थांबणार नाही, तर ज्यांनी ज्यांनी ही बनावट कागदपत्रे बनवली आणि वापरली, त्या सर्वांवर गुन्हे दाखल करून त्यांची रवानगी कोठडीत केली जाणार आहे. या कारवाईमुळे बोगस लाभार्थी आणि हे रॅकेट चालवणाऱ्यांचे धाबे दणाणले असून, पुढील काळात ही मोहीम अधिक तीव्र करण्याचे संकेत प्रशासनाने दिले आहेत. खऱ्या लाभार्थ्यांना न्याय मिळावा आणि एसटीचे होणारे आर्थिक नुकसान टाळावे, यासाठी ही मोहीम यापुढेही सुरू राहणार आहे. नागरिकांनी अशा बोगसगिरीला बळी पडू नये, असे आवाहनही प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.



# चंद्रपूरचा 'गड' आणि दिल्लीचा 'तडजोड' फॉर्म्युला!

चंद्रपूर महानगरपालिकेच्या राजकारणाने गेल्या काही दिवसांपासून संपूर्ण राज्याचे लक्ष वेधून घेतले होते. स्थानिक नेत्यांमधील अंतर्गत कलह, वर्चस्वाची लढाई आणि 'हायकमांड'पर्यंत गेलेला हा वाद अखेर दिल्लीच्या दरबारी शमला आहे. खासदार प्रतिभा धानोरकर आणि ज्येष्ठ नेते विजय वडेट्टीवार यांच्यातील सुप्त संघर्षावर काँग्रेसने काढलेला मध्यममार्ग हा केवळ सत्तेचा फॉर्म्युला नसून, आगामी राजकीय समीकरणांची नांदी ठरणार आहे.

नवी दिल्लीत काँग्रेसचे संघटनात्मक सरचिटणीस के. सी. वेणूगोपाल यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत सत्तेचे वाटप गणिती पद्धतीने करण्यात आले. यामध्ये धानोरकर गटाचे पारडे जड असल्याचे दिसते.महापौरपद: खासदार प्रतिभा धानोरकर यांच्या गटाला झुकते माप देत महापौरपद बहाल करण्यात आले आहे.उपमहापौरपद व गटनेतेपद: विजय वडेट्टीवार यांच्या गटाला उपमहापौरपद आणि महापालिकेतील गटनेतेपद देऊन त्यांचे राजकीय वजन कायम राखण्याचा प्रयत्न झाला आहे.स्थायी समिती: महाविकास आघाडीतील घटक पक्ष किंवा पाठिंबा देणाऱ्या गटाला स्थायी समिती सभापतीपद देऊन मित्रपक्षांना चुचकारण्याची रणनीती आखली आहे.या बैठकीतील सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे हायकमांडने दिलेला एकमेकांच्या कामात लुडबुड नको हा आदेश. चंद्रपूरच्या राजकारणात धानोरकर आणि वडेट्टीवार या दोन ध्रुवांवरील नेत्यांच्या संघर्षामुळे पक्षाची प्रतिमा डागाळत असल्याची जाणीव दिल्लीला झाली होती. म्हणूनच, आपापल्या विधानसभा क्षेत्रात आणि प्रभागात मर्यादित राहून संघटना बळकट करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. हा आदेश म्हणजे दोन्ही नेत्यांना दिलेला एक प्रकारचा 'अल्टिमेटम' मानला जात आहे.

काँग्रेसकडे सध्या २७ जागा आहेत आणि समर्थित ३ जागा धरून हा आकडा ३० पर्यंत पोहोचतो. मात्र, ६६ सदस्यांच्या सभागृहात बहुमतासाठी ३४ हा आकडा गाठणे आवश्यक आहे.

उर्वरित ४ नगरसेवकांची जुळवाजुळव करण्याची जबाबदारी आता प्रतिभा धानोरकर यांच्यावर आहे.

ठाकरे गटाचे ६ नगरसेवक किंगमेकरच्या भूमिकेत आहेत. त्यांनी आधीच महापौरपदावर दावा केला असून, भाजप आणि काँग्रेस अशा दोन्ही बाजूंकडे त्यांचे लक्ष आहे. त्यामुळे धानोरकर यांना आपली राजकीय मुत्सद्देगिरी पणाला लावावी लागणार आहे.एकिकडे काँग्रेसमध्ये अंतर्गत तडजोडी होत असताना, भाजप २३ जागांसह संधीची वाट पाहत आहे. जर काँग्रेसमधील अंतर्गत कलह पुन्हा उफाळून आला, तर भाजप 'ऑपरेशन लोटस' सारख्या हालचाली करण्याची शक्यता नाकारता येत नाही. या पार्श्वभूमीवर काँग्रेस हायकमांडने घेतलेला निर्णय हा पक्षाची सत्ता टिकवण्यासाठी घेतलेली खबरदारी आहे.दिल्लीतील या तोडग्यामुळे तात्पुरती शांतता प्रस्थापित झाली असली, तरी प्रत्यक्ष महापौर निवडीच्या दिवशी सर्व नगरसेवक एकदिलाने मतदान करतात का, हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल. प्रतिभा धानोरकर यांनी स्वतःला सिद्ध करण्याची ही मोठी संधी आहे, तर वडेट्टीवार यांना आपल्या समर्थकांचे हित जपण्याचे आव्हान आहे. शेवटी, चंद्रपूरच्या विकासासाठी हे दोन्ही गट एकत्र काम करतात की 'लुडबुड' सुरूच राहते, यावरच काँग्रेसच्या या फॉर्म्युलाचे यश अवलंबून आहे.

# माणसे जपायची असतात पण आपण माणसांनाच वापरतोय!

माणसे जपायची असतात आणि पैसा वापरायचा असतो; पण आज लोक पैसा जपतात आणि माणसे वापरतात. हे वाक्य केवळ तात्त्विक नाही, तर आजच्या समाजाचे अचूक एक्स-रे आहे. या एका ओळीत आपल्या सामाजिक अधः पतनाची, नात्यांच्या विघटनाची आणि मूल्यांच्या घसरणीची संपूर्ण कहाणी सामावलेली आहे. दुर्दैव इतकेच की, हे सत्य आपल्याला माहिती असूनही आपण त्याकडे जाणीवपूर्वक डोळेझाक करत आहोत. आजचा काळ हा केवळ आर्थिक स्पर्धेचा नाही, तर मानवी मूल्यांवर चाललेल्या अदृश्य युद्धाचा काळ आहे. या युद्धात पैसा जिंकतो आहे आणि माणूस हरतो आहे. पैसा कधीच वाईट नव्हता. तो माणसाच्या गरजांसाठी निर्माण झालेला एक साधन होता पण साधन हळूहळू साध्य बनू लागले आणि साध्य असलेला माणूस उपयुक्ततेच्या निकषांवर तोलला जाऊ लागला. आज माणसाची किंमत त्याच्या संवेदनशीलतेवर नाही, तर त्याच्या आर्थिक क्षमतेवर ठरते. आज समाजात विचारले जाणारे प्रश्न बदलेले आहेत. तू कसा आहेस? यापेक्षा तू काय करतोस? किती कमावतोस? तुझा स्टेटस काय? हे प्रश्न महत्त्वाचे ठरले आहेत. या प्रश्नांमागे माणसाविषयीची आपुलकी नाही, तर त्याच्या उपयोगितेची चाचपणी आहे.

पूर्वी नाती भावनेवर उभी राहायची. आज ती व्यवहारावर टिकतात. आज प्रत्येक नात्यामागे एक अदृश्य अट असते जोपर्यंत उपयोग, तोपर्यंत संबंध. मित्र तेव्हाच जवळचा, जोपर्यंत तो कामाचा आहे. नातेवाईक तेव्हाच आपले, जोपर्यंत त्यांच्याकडून काही मिळणार आहे. कार्यकर्ता तोपर्यंत महत्त्वाचा, जोपर्यंत तो मतांमध्ये रूपांतरित होतो. कर्मचारी तोपर्यंत हवासा, जोपर्यंत तो 'प्रॉफिटेबल' आहे. आज माणूस माणूस म्हणून स्वीकारला जात नाही; तो गुंतवणूक म्हणून पाहिला जातो. जिथे 'रिटर्न' नाही, तिथे संबंध संपवायला कोणालाही अपराधीपणा वाटत नाही. ही मानसिकता केवळ अमानवी नाही, तर समाजघातकी आहे. महानगरे विस्तारत आहेत. उंच इमारती उभ्या राहत आहेत. स्मार्ट सिटी, स्मार्ट रोड, स्मार्ट लाईफ सगळं काही 'स्मार्ट' होत आहे. पण या स्मार्टपणात माणूस मात्र एकटा पडतो आहे. एकाच इमारतीत राहणारी माणसं एकमेकांना ओळखत नाहीत.

शेजाऱ्याचा मृत्यू मोबाईल नोटिफिकेशनद्वारे कळतो. दुःखाला वेळ नाही, संवादाला उसंत नाही, माणसाला थांबवायला कोणी नाही. संपर्क वाढले आहेत, पण संवाद संपले आहेत. नेटवर्किंग वाढले आहे, पण नाती तुटली आहेत. कारण वेळ जपायचा असतो माणसांसाठी नाही, तर पैशासाठी. कुटुंब ही माणूस जपण्याची पहिली शाळा असते. पण आज तिथेही व्यवहार शिरकाव करू लागला आहे. वृद्ध आई-वडील जबाबदारी वाटू लागतात. मुलं इन्व्हेस्टमेंट ठरतात. लग्न हे नातं न राहता 'सेटलमेंट' बनते. आज प्रश्न असा उरलेला नाही की आपण कुटुंबासाठी काय करतो, तर प्रश्न आहे, आपल्याला त्यातून काय मिळतं? ज्या दिवशी नात्यांमधून अपेक्षा वाढतात आणि समजूत कमी होते, त्या दिवशी कुटुंब कोसळायला सुरुवात होते.

आजच्या आर्थिक व्यवस्थेत माणूस आकड्यात बदलला आहे. कामगार म्हणजे 'कॉस्ट'. शेतकरी म्हणजे 'डेटा'. रुग्ण म्हणजे 'केस'. विद्यार्थी म्हणजे 'फीस'. माणसाच्या वेदना, त्याचा संघर्ष, त्याची कथा या सगळ्याला व्यवस्थेत स्थान नाही. कारण त्यातून थेट नफा मिळत नाही. आपण विकासाच्या नावाखाली व्यवस्था उभी करतो, पण त्या व्यवस्थेत माणूस बसतच नाही आणि मग प्रश्न पडतो, हा विकास नेमका कोणासाठी? राजकारणात माणूस मतदार असतो. निवडणुकीच्या काळात त्याच्यासाठी घोषणांचा पाऊस पडतो. आश्वासनांची खैरात होते. पण निकाल लागल्यानंतर तो पुन्हा विसरला जातो. लोकप्रतिनिधी जपले जातात, सत्ता जपली जाते, निधी जपला जातो पण माणूस मात्र वापरला जातो. लोकशाहीचा आत्मा माणसात असतो, पण आज लोकशाही केवळ आकड्यांमध्ये उरली आहे. आज वापरणे ही सवय झाली आहे, नात्यांचा वापर, भावनांचा वापर, माणसांचा वापर. जो माणूस प्रश्न विचारतो, तो त्रासदायक ठरतो. जो झुकतो, तो उपयुक्त ठरतो. ही संस्कृती माणसाला गप्प बनवते, संवेदनांना बोथट करते आणि समाजाला निर्दयी बनवते आणि शेवटी, हाच समाज एकाकी, अस्वस्थ आणि हिंसक बनतो. पैसा साठवता येतो, पैसा वारसा देता येतो, पैसा बँकेत सुरक्षित ठेवता येतो, पण माणूस? तो जपला नाही, तर निघून जातो आणि तो गेला, की परत येत नाही.

आयुष्याच्या शेवटी पैसा उपयोगी पडत नाही. तेव्हा आठवण येते ती माणसांची, ज्यांना आपण वेळ दिला नाही, जपलं नाही, समजून घेतलं नाही. वेळ आहे, दिशा बदलण्याची, आजही वेळ गेलेली नाही पण त्यासाठी आत्मपरीक्षण गरजेचं आहे.

आपण पैसा जपतोय की माणसं, याचा विचार करायला हवा. पैसा वापरायला शिका शिक्षणासाठी, आरोग्यासाठी, समाजासाठी पण माणसं जपा, कारण समाज माणसांवर उभा असतो, नफ्यावर नाही. जर आपण आजही माणसांपेक्षा पैशाला महत्त्व देत राहिलो, तर उद्या आपल्या भोवती सर्व काही असेल. घर, गाडी, संपत्ती पण कोणीच आपलं नसेल. कारण पैसा साथ देत नाही. तो फक्त साक्षीदार असतो आपल्या अपयशाचा. म्हणून माणसे जपायची असतात कारण शेवटी माणूसच माणसाच्या कामी येतो.

**-प्रविण बागडे**
**नागपूर**

# स्त्री..... कमजोर...... नाहीच

अजीत पवार. ज्यांची पत्नी आज महाराष्ट्राची पहिली महिला उपमुख्यमंत्री बनली. कुणी म्हणतात त्यांनी त्यांच्या पतीच्या चितेची आग थंड होवू द्यायला हवी होती. परंतु तसं घडलं नाही व त्यांनी महाराष्ट्राची उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली, स्व दुःख क्षणातच विसरुन. याचा अर्थ असा नाही की त्यांना दुःख झालं नसेल.सुनेत्रा पवार. ती महिला आहे. ती कमजोर आहे. असं बरेचजण म्हणत असतील. ती काय उपमुख्यमंत्री म्हणून पद सांभाळू शकतील, असेही कोणी म्हणत असतील. परंतु ते सगळं खोटं आहे व ते विचारही खोटे आहेत. सुनेत्रा पवार ही एक स्त्री असली तरी ती कमजोर नाहीच. कारण तिनं एक अजीत पवार नावाचा व्यक्ती घडवला. त्याला उपमुख्यमंत्री पदापर्यंत नेलं. असं म्हटल्यास आतिशयोक्ती होणार नाही.

स्त्री ही एका व्यक्तीला जन्म देते. त्याला मोठा करते व सक्षम बनवते. तिच्यात दुर्गा, पार्वती व काली वसते. हवं तर मोठमोठी साम्राज्य धराशायी करते. याचा इतिहास जर पाहिला तर आपल्याला हेच दिसतंय की मोठमोठी साम्राज्य एका स्त्रीनं धराशायी केलीत. एवढंच नाही तर एका स्त्रीनं असे असे महापुरुष घडवले. ज्यांनी नवनवीन साम्राज्याची नीव टाकली. जसे शिवाजी महाराज. त्यांनाही एका स्त्रीनंच घडवलं आणि मढवलंही. तशीच महाराणी ताराबाई की जिनं एक स्त्री असूनसुद्धा औरंगजेबाला महाराष्ट्राच्या मातीत मिळवलं. यावरुन स्त्री ही कमजोर वाटत नाही. परंतु स्त्री स्वतः ती कमजोर आहे असं भासवते. याचं कारण आहे तिची स्वतःची मानसिकता. ती मानसिकता तिची स्वतःला कमजोर समजण्याची असते. हे विवाहावरुन दिसून येते. विवाहानंतर एक स्त्री आपल्या पतीपेक्षा स्वतःला कमजोर समजून वागते. कारण ती पतीची आज्ञा पाळते. मान ठेवते.

आपण मांजर पाहिलीच असेलच. ती मांजर कुत्रा दिसला की त्याच्यासमोर आपले केसं उभे करते. आपल्या शरीराला फुगवते. त्याचं कारण काय? तशीच आपण कोंबडी पाहिली असेलच. तिचे जेव्हा पिल्ले लहान असतात, अशावेळेस आपण तिच्याजवळ गेल्यास ती पंख फुगवते व आपल्या पिल्लाच्या रक्षणासाठी ती तिच्या वाट्याला जाणाऱ्यावरही हमला करते. ज्यातून तिच्याजवळ जाणं कठीण होवून बसतं. असे अनेक प्राणी आहेत की जे आपल्याहून छोटे जरी असले तरी त्यांना आपण घाबरतो. त्याचं कारण असतं त्यांचा आक्रमक पवित्रा. साप जरी लहानसा असला तरी त्यालाही आपण घाबरतो. त्याचंही कारण आहे, त्यांच्यातील आक्रमक पवित्रा.

स्त्री ही कमजोर नाही. कारण बऱ्याच स्त्रियांनी भवसागर पादाक्रांत केलेला आहे. साध्या प्राण्यांचं उदाहरण घेतलं आणि ताकद पडताळून पाहिली तर एखाद्यावेळेस लहान प्राणीही बलशाली ठरतात. तसंच स्त्रियांनी स्वतःला असे बनवावे की ती बलशाली ठरेल. तशी तिनं मानसिकताच तयार करावी. म्हणजे ती कमजोर ठरणार नाही, होणार नाही. एक विचार आला होता व्हाट्सअपवर. विचार होता, 'मनुस्मृती नुसार पती गेल्यावर पत्नी सती जात असे. आज तसं नाही. आजची पत्नी नवरा सती गेल्यावर उपमुख्यमंत्री बनते. कारण आज संविधान आहे व संविधान हे सगळं करवून घेतं.'बरोबर आहे हे म्हणणं. कारण विशेष आहे. विशेष म्हणजे आजच्या काळात कुणीही सती जावू शकत नाही. ४ डिसेंबर १८२९ मध्ये लार्ड विल्यम बेंटीक याने सती बंदीचा कायदा पास करुन सतीप्रथा कायमची बंद केली. २६ नोव्हेंबर १९४९ ला जे संविधान तयार झालं. त्या संविधानानुसार सतीप्रथेच्याच नाही तर कोणत्याही स्त्रीवर होणाऱ्या अत्याचारावर ब्रेक लावला आणि ते अत्याचार बंद केले.

आज संविधान बनलं व संविधान ही जशी इतर सर्व लोकांची ताकद बनली. तशी ताकद स्त्रियांसाठीही संविधानानं निर्माण केली. स्त्रीला सुरक्षीत बनवलं व स्त्री सुरक्षीत झाली. परंतु असं असलं तरी स्त्री सुरक्षीत आहे काय? तर त्याचं उत्तर नाही असंच आहे. कारण आजची स्त्री स्वतःला कमजोरच समजत आहे. ती सक्षम असूनसुद्धा. शिवाय हीच स्त्री सांगते की याला कारणीभूत आहे येथील पुरुषी संस्कृती. खरं आहे व लोकं फक्त पुरुषांनाच दोष देवून मोकळे होतात. ज्यात स्त्रिया सुद्धा स्त्रियांच्याच अधोगतीला वा तिची असुरक्षीत करण्यास कारणीभूत ठरतात.

स्त्रियांवर अत्याचार होतो व तो होत असलेला अत्याचार आजचा नाही तर तो अनादीकालापासून होतो. ज्यात स्त्रीच्या विनाशास पुरुष नाही तर स्त्रीसुद्धा जबाबदार आहेच. युगाचे जे चार युग झाले. त्या युगापैकी त्रेतायुगाची गोष्ट घेतली तर असे दिसून येते की राम, लक्ष्मण भरत व शत्रुघ्नचा विवाह झाल्यानंतर आपल्या भरताला राज्य मागणारी कैकेयी एक स्त्री असूनसुद्धा तिनं तिचीच सवत असलेल्या कौशल्याच्या मनाचा विचार केला नाही. त्यातच जर रामाला चौदा वर्षाचा वनवास दिला तर त्यांच्या पश्चात त्यांच्या पत्नीचे काय हाल होईल. हे सुद्धा लक्षात घेतले नाही. हा एक प्रकारचा अत्याचारच होता एका स्त्रीकडून एका स्त्रीवर होत असलेला. त्यातच महाराणी कैकेयीला भडकविणारी तिची दासी मंथरा देखील एक स्त्रीच होती. यात पुरुषी मानसिकता वा पुरुष कुठून आला स्त्रीवर अत्याचार करायला.

द्वापर युगातही तेच घडलं. त्या युगातील द्रौपदी, जिच्यामुळं अख्खं महाभारत घडलं. ती दुर्योधन इंद्रप्रस्थला तोंडघशी पडताच हसली. त्यात त्याचा अपमान झाला व त्याचा बदला म्हणून त्यानं तिच्या पतींना द्युतयुद्धात हारवलं. काय गरज होती तिला हसायची? ज्यातून त्यानं तिचा अपमान करीत तिचे केसं धरुन राजसभेत आणलं. ज्या राजसभेत कुंती होती, ज्या राजसभेत गांधारी होती. कुंती व गांधारी राजसभेतील स्त्रियाच होत्या की ज्या आपल्यासमोर आपल्या कुलवधूवर होत असलेला अत्याचार पाहात होत्या. वाटल्यास त्या द्रौपदीवर दुर्योधनाकडून होत असलेला अत्याचार थांबवू शकत होत्या. परंतु त्यांनी तसं केलं नाही. त्या त्यांच्या नाशाला कारणीभूत ठरल्या. अर्थात एक स्त्री एका स्त्रीवरच अत्याचार होत असलेला पाहणारी. कृतयुगातही तसंच घडलं. कृतयुगातही बऱ्याच स्त्रियांवर स्त्रियांकडून अत्याचार झाला आणि बदनाम होत गेली पुरुष जात व पुरुष संस्कृती. हो म्हणतात की रावणानं सीतेचं हरण केलं. रावण पुरुष आणि सीता स्त्री. काय गरज होती रावणासारख्या पुरुषानं सीतेसारख्या स्त्रीचं हरण करण्याची? परंतु हे जरी बरोबर असलं तरी सुरपंखा एक स्त्रीच होती ना. तिला काय गरज होती लक्ष्मणाकडे जायची?

महत्वपुर्ण बाब ही की स्त्रियांचा दोष ना द्वापर युगात दिसला, ना कृतयुगात दिसला, ना त्रेतायुगात दिसला. ज्यातून स्त्रीच असुरक्षीत राहिली. ती स्वतः ला कमजोर समजून घेत राहिली. ती अत्याचार भोगत आली. आजही तीच गत आहे. आजही एक स्त्री सासू बनवून दुसऱ्या स्त्रीला घरी आणते व तिच्यावर अत्याचार करते. तसंच आज एक स्त्री सुन बनून घरात येते व ती सासूवर अत्याचार करते. अन् दोषी ठरतो तिचा पती. जो असहाय्य असतो. त्याच्यासमोर सासू असलेली त्याची आई व पत्नी असलेली ती नववधू. दोघ्याही समानच असतात. अशातच जेव्हा भांडणं चालतात. तेव्हा तो काय बोलणार? तो बोलू शकत नाही. पत्नीची बाजू घेवून बोलल्यास आईला राग आणि आईची बाजू घेवून बोलल्यावर पत्नीला राग. शेवटी पिसाई त्याचीच होते व तो बोलत नसल्यानं दोषी ठरतो.स्त्री असुरक्षीत आहे. कालही होती व आजही आहे आणि ती का झाली? ती स्वतःच झाली की तिला दुसऱ्यानं असुरक्षीत केलं? याचं उत्तर आहे ती स्वतः देखील असुरक्षीत झाली आणि तिला तिच्याच बिरादरीतील एका स्त्रीनं सुद्धा असुरक्षीत केलं.

तिला एका स्त्रीनं असुरक्षीत केलं या अर्थाने बाहेरील जगातून विचार केल्यास बाहेरच्या जगतात एक स्त्री दुसऱ्या स्त्रीशी मैत्री करुन तिचा सौदा करते व तिला वेश्येच्या बाजारातही विकून टाकते. एक स्त्री सासू वा सुन बनून दुसऱ्या स्त्री असलेल्या सासू वा सुनेवर अत्याचार करते. ही वास्तविकता आहे.

पुरुषी अत्याचाराबाबत सांगतांना एवढंच सांगता येईल की आजची ही स्त्री, ती स्वतः असुरक्षीत झाली या अर्थानं विचार केल्यास याचं पहिलं कारण आहे, ती रात्री अपरात्री रस्त्यावर वाहतूक नसतांना एकटीच फिरत असते. अशावेळेस ती भुरट्यांच्या नजरेस पडते व भुरटी मंडळी तिच्यावर डोळे घालतात. दुसरं कारण असे की ती स्त्री जर मेकअप लावून, तोकडे कपडे अंगावर परिधान करुन, केसाचं सौंदर्य वाढवून फिरत असेल तर ती असुरक्षीत होते. तिसरं स्त्रियांवर अत्याचारास आमंत्रण देणारं कारण म्हणजे व्यक्तीचा स्वभाव. काही लोकं खरंच वासनांध व कुस्वभावाचे असतात की जे एकटी स्त्री दिसली तर तिच्यावर अत्याचार करतात. मग ती स्त्री ओळखीची वा ती अनोळखीची स्त्री आहे याचा विचार करीत नाहीत. तसं पाहिल्यास सर्वच पुरुष हे कुस्वभावी व वासनांध नसतात. काही पुरुष हे नक्कीच चांगले व सुस्वभावी असतात. ते पुरुष एखादी स्त्री जरी एकटीच असेल तरी तिला अभय देतात. तिचं रक्षण करतात नव्हे तर स्वतः लढून तिला वाचवतात. हेही सत्यच आहे.

स्त्री ही स्वतःला सुरक्षीत करु शकते. जरी ती एकटीही असली तरी. कारण तिच्यात दुर्गा, पार्वती, काली वसते. तिच्यात अलौकीक अशी ताकद असते. जी स्त्री नऊ महिने बाळाचा त्रास सहन करुन त्याला जन्म देते. त्याचं पालनपोषण करुन त्याला सक्षम बनवते. यासाठी ताकद लागतेच. ती ताकद स्त्रीशिवाय कोणत्याच पुरुषात असूच शकत नाही. एवढंच नाही तर पती पत्नीपैकी जर पती मरण पावला आणि त्याला जर मुलं असतील तर तो सांभाळू शकत नाही किंवा पत्नीशिवाय राहू शकत नाही. तो लगेच आपला विवाह करुन टाकतो. परंतु त्याच जागी त्याची पत्नी असेल तर ती एकटी राहून आपल्या लेकरांना पोसू शकते. ही आहे तिची ताकद. आजची स्त्री ही असुरक्षीतही नाही आणि कमजोरही नाही. ती कमजोर बनते स्वतः च्या मानसिकतेनं. ती जेव्हा पुरुषासोबत विवाह करते. तेव्हा आपण कमजोर आहोत. अशीच ती मानसिकता बनवून पुरुषांच्याच मनानं चालते. म्हणूनच ती कमजोर वाटते. एव्हाना ती कमजोर नाहीच. हे तेवढंच खरं. त्यामुळंच खरं सांगायचं म्हणजे आज बनलेल्या महाराष्ट्राच्या पहिल्या महिला मुख्यमंत्रीही कमजोर नाहीत आणि तसं कोणीही समजू नये. त्यातच त्यांनी महाराष्ट्राचं नेतृत्व करीत असतांना स्त्रियांना सक्षम बनवावं. एवढं सक्षम बनवावं की कोणतीही स्त्री स्वतःला कमजोर समजणार नाही.

**-अंकुश शिंगाडे ,नागपूर**

# अर्थसंकल्प २०२६-२७ : भारताच्या आरोग्य क्रांतीचा नवा

**अध्यायविश्लेषण: डॉ. विशाल वि. आंबेडकर आणि डॉ. सुनिल भारोडकर**

भारताच्या अमृतकाळातील हा ८० वा पूर्ण अर्थसंकल्प केवळ आकड्यांचा खेळ नसून, तो देशाच्या आरोग्य सुरक्षेचा एक 'ब्लूप्रिंट' आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सलग नवव्यांदा आणि ऐतिहासिकरीत्या रविवारी सादर केलेला हा अर्थसंकल्प भारताला 'निरोगी भारत' बनवण्याच्या दिशेने एक आक्रमक पाऊल आहे.१. आरोग्य क्षेत्रासाठी 'महा-तरतूद' : आकडे बोलतातयंदाच्या अर्थसंकल्पात आरोग्य क्षेत्राला तीन मुख्य स्तंभांमध्ये विभागून भरीव निधी देण्यात आला आहे. मागील दोन वर्षांच्या तुलनेत ही वाढ थक्क करणारी आहे:प्रमुख विभाग२०२४-२५ (प्रत्यक्ष खर्च)२०२६-२७ (नियोजित तरतूद) वाढ (सुमारे)केंद्रीय क्षेत्रातील आरोग्य योजना ५,४३७.१९ कोटी ८,४००.७ कोटी+५४%राष्ट्रीय आरोग्य अभियान (छक्ष्च) ८७,३००.१७ कोटी १,०१,७०९.२१ कोटी+१४,४०९ कोटीआरोग्य विकास सेवा ४२,८५२.९ कोटी ४८,०१३.५४ कोटी+५,१६० कोटी२. पायाभूत सुविधांचा कायापालट: प्रधानमंत्री स्वास्थ्य सुरक्षा योजनादेशातील आरोग्याची प्रादेशिक विषमता दूर करण्यासाठी सरकार आता 'ॲग्रेसिव्ह' मोडमध्ये आहे.उद्देश: ज्या भागात अद्ययावत रुग्णालये नाहीत, तिथे एम्स (-खखचड) सारख्या संस्था आणि सुपर स्पेशालिटी ब्लॉक्स उभारणे.गुंतवणूक: केंद्रीय योजनांच्या निधीत झालेली सुमारे २,९६३ कोटींची वाढ ही प्रामुख्याने मागास भागातील वैद्यकीय संशोधन आणि आधुनिक रुग्णसेवेसाठी वापरली जाणार आहे.३. राष्ट्रीय आरोग्य अभियान (छक्च्): तळागाळातील आरोग्य सक्षमीकरण१,०१,७०९ कोटी रुपयांची ही अवाढव्य तरतूद भारताच्या ग्रामीण आणि शहरी आरोग्य व्यवस्थेचा कणा ठरणार आहे.ग्रामीण भाग: क्षयरोग (ढइ), कुष्ठरोग आणि डासजन्य आजारांविरुद्ध आता अधिक तीव्र लढा दिला जाईल. माता आणि बाल मृत्यूदर कमी करण्यासाठी हा निधी गेम-चेंजर ठरेल.शहरी भाग: शहरी गरिबांसाठी स्वतंत्र आरोग्य यंत्रणा अधिक बळकट करण्यावर भर देण्यात आला आहे.४. मनुष्यबळ विकास: डॉक्टर आणि नर्सेसची फळीकेवळ इमारती बांधून आरोग्य सुधारत नाही, तर त्यासाठी प्रशिक्षित हात हवेत.वैद्यकीय शिक्षण: जिल्हा रुग्णालयांचे रूपांतर वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये करण्यासाठी आणि पदव्युत्तर (झत्रह) जागा वाढवण्यासाठी विशेष प्रोत्साहन दिले गेले आहे.नर्सिंग क्रांती: नवीन नर्सिंग महाविद्यालयांच्या उभारणीमुळे आरोग्य सेवेतील कर्मचाऱ्यांची कमतरता भरून काढण्यास मदत होईल.५. आयुष्मान भारत: गरिबांचे सुरक्षा कवचआयुष्मान भारत योजनेचा विस्तार आता ऐतिहासिक स्तरावर पोहोचला आहे.व्याप्ती: १२ कोटी कुटुंबांपासून सुरू झालेला हा प्रवास आता आशा सेविका, अंगणवाडी सेविका आणि ४.५ कोटी ज्येष्ठ नागरिकांपर्यंत पोहोचला आहे.आर्थिक संरक्षण: ५ लाख रुपयांपर्यंतचे मोफत उपचार हे केवळ वैद्यकीय मदत नसून, अनेक कुटुंबांना गरिबीच्या चक्रातून बाहेर काढण्याचे साधन बनले आहे.६. प्रतिबंधात्मक आरोग्य आणि संशोधन'उपचारांपेक्षा प्रतिबंध बरा' या उक्तीनुसार ४८,०१३.५४ कोटी रुपये आरोग्य विकास सेवांसाठी राखीव आहेत.यामध्ये कुटुंब कल्याण, मोफत गर्भनिरोधक साधने आणि लोकसंख्या संशोधनावर भर दिला आहे.एड्स आणि लैंगिक रोगांच्या नियंत्रणासाठी करण्यात आलेली २,३०७ कोटींची वाढ ही भविष्यातील आरोग्य संकटांना रोखण्यासाठीची महत्त्वाची गुंतवणूक आहे.निष्कर्ष: आरोग्यपूर्ण भारताचा संकल्पअर्थसंकल्प २०२६-२७ हा केवळ सरकारी खर्च नाही, तर ती भारताच्या मानवी भांडवलावर केलेली गुंतवणूक आहे. आरोग्य सेवा आता 'प्री-पेमेंट' (विमा) आणि 'पायाभूत सुविधा' अशा दुहेरी पातळीवर सक्षम होत आहे. जर या निधीची अंमलबजावणी प्रभावीपणे झाली, तर भारत जागतिक स्तरावर सर्वात मजबूत आणि स्वस्त आरोग्य व्यवस्था असलेला देश म्हणून नावारूपाला येईल यात शंका नाही.

# जागतिक कर्करोग दिन : कर्करोगाचे प्राथमिक अवस्थेत रोगनिदान होणे आवश्यक

संपुर्ण जगामध्ये दरवर्षी ०४ फेब्रुवारी रोजी 'जागतिक कर्करोग दिन' साजरा करण्यात येतो. कर्करोगाबाबत लवकर निदान होणे, प्रतिबंध करणे, उपचार व जीवनशैलीचा वापर इत्यादी विषयी जनजागृती करणे हे मुख्य उदिद्ष्ट आहेत. जागतिक कर्करोग दिनाचे प्राथमिक उदिद्ष्ट कर्करोगाचे प्रमाण व मृत्यू कमी करणे असुन, कर्करोगापासुन बचाव कसा करावा या बाबतची माहितीची जनजागृती करण्याचे उदिद्ष्ट आहे.

असंसर्गजन्य आजारांची झपाट्याने वाढ होत असल्यामुळे कर्करोगाबाबतची माहिती जनतेस मिळणे आवश्यक आहे. कारण कर्करोग कोणालाही होवू शकतो. जागतिक आरोग्य संघटनेनुसार कर्करोग हा दुसऱ्या क्रंमाकाचा सर्वात घातक आजार आहे.

अंतिम टप्प्यात असलेल्या कर्करोगामुळे मृत्यू होतो. कर्करोगामुळे मृत्यू होणाऱ्या लोकांची स्थिती भारतासाठी गंभीर आहे. कर्करोगामध्ये रोगांचा समुह असुन, त्यामध्ये असामान्य पेशी अनियंत्रितपणे वाढुन शरीराच्या अवयवमध्ये पसरतात. न्कोलॉजी (कर्करोगाचा अभ्यास) आणि कर्करोगावरील संशोधनासाठी प्रशिक्षण व शिक्षणासाठी सुविधा प्रदान करणे आवश्यक आहे. ज्यामुळे कर्करोगामुळे होणारे मृत्यू टाळणे शक्य होईल.

कर्करागाच्या प्राथमिक अवस्थेत सतत अतिसार, अशक्तपणा, खोकला तोंडातुन रक्त येणे, स्तनातील गाठ, कर्करोगाच्या पहिल्या टप्प्यात कमीत कमी किंवा कोणतेही लक्षणे आढळुन येत नाही.

यासाठी मेमोग्राम, ओ.व्ही.ई., व्ही. आय.ऐ., सिटी स्कॅन, एम.आर.आय., सोनोग्राफी, बायोप्सी इ. तपासणीमुळे कर्करोग अंतिम टप्प्यामध्ये जाण्यापुर्वी कर्करोगाचे निदान होते. एच.पी.व्ही. (हयुमन पॅपिलोमाव्हायरस) लसींमुळे गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग टाळता येतो. तसेच हिपॅटायटीस बी या लसीमुळे यकृतचा कर्करोग होण्याचा धोका कमी होतो.आज कर्करोगामध्ये विविध उपचार उपलब्ध आहेत. रुग्णांच्या शरीरामध्ये किंवा कोणत्या टप्प्यात आहे यावर उपचार पध्दती अवलंबुन आहे. कर्करोगाच्या उपचारामध्ये शस्त्रक्रिया, केमोथेरपी, रेडियशन थेरपी, इम्युनोथेरपी, हार्मानथेरपी इ. प्रकाराचा वापर केला जातो.

कर्करोगाच्या पहिल्या टप्प्यात कमीत-कमी किंवा कोणतेही लक्षणे आढळुन येत नाही. याकरिता नियमित तपासणी होणे आवश्यक आहे. कारण कर्करोग अंतिम टप्प्यात जाण्यापुर्वी कर्करोगाचे निदान होते. त्यामुळे पुढील मृत्यूचा धोका टळतो. लवकर निदान लवकर उपचारामुळे कमी खर्चात उपचार होतो. अर्थात उशीरा निदान झाल्यामुळे उपचार खर्चिक होतो. तसेच हॉस्पीटलमध्ये दीर्घकाळ ऑडमिट राहावे लागते.संतुलीत आहार, फळे, हिरवा पालेभाज्या इ. समावेश असावा. नियमित व्यायाम करणे. अतिनील किरणोत्सर्गाचा संपर्क टाळणे, प्रदुषण, तंबाखु व मद्यपानाचे सेवन करु नये. रोगप्रतिकार शक्ती चांगली असल्याकारणाने कर्करोगाचा धोका कमी होतो. निरोगी जीवनशैली असावी.

जालना जिल्ह्यात सन २०२१ ते २०२५ या कालावधीत मौखिक कर्करोगाच्या ७५, ९५५ तपासणी करण्यात आल्यात यामध्ये १८४ रोगनिदान झाले असुन, १७३ औषधोपचाराखाली आहेत. तसेच स्तनाचा कर्करोगाच्या ३९,४३२ तपासणी करण्यात आल्यात यामध्ये १४२ रोगनिदान झाले असुन, १३३ औषधोपचाराखाली आहेत. गर्भाशय मुखाचा कर्करोगाच्या ५०,३८३ तपासणी करण्यात आल्यात यामध्ये १५८ रोगनिदान झाले असुन, १४१ औषधोपचारा खाली असल्याची माहिती जिल्हा आरोगय अधिकारी डॉ. जयश्री भुसारे यांनी दिली. जिल्ह्यातील ३० वर्षावरील स्त्री / पुरुष यांनी नियमित आपल्या आरोग्याची तपासणी करुन घ्यावी. तसेच अधिक माहितीसाठी टोल फ्रि क्रमांक १०४ / १०२ या हेल्पलाईनवर कॉल करावा.

# बीड बायपास मृत्यूचा सापळा!

## प्रशासकीय दिरंगाईमुळे 'आप' आक्रमक; अधिकाऱ्यांच्या टोलवाटोलवीत सामान्यांचा बळी जाणार का?

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी/** शहरातील बीड बायपास परिसरातील आयप्पा मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्यावर प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे मृत्यूचे दोन मोठे खड्डे उघड्यावर पडले आहेत. या गंभीर विषयावर 'आम आदमी पार्टी'ने वारंवार आवाज उठवूनही जागतिक बँक प्रकल्प अधिकारी आणि महानगरपालिका प्रशासन एकमेकांकडे बोट दाखवण्यात धन्यता मानत आहे. प्रशासन कोणाच्या मृत्यूची वाट पाहत आहे का? असा संतप्त सवाल आता जनतेतून उपस्थित केला जात आहे.

आयप्पा मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्याच्या दोन्ही बाजूला मल विसर्जनाचे दोन अवाढव्य खड्डे आहेत. हे खड्डे इतके धोकादायक आहेत की, तिथे कोणताही सूचनाफलक किंवा बॅरिकेडिंग लावलेले नाही. रात्रीच्या वेळी किंवा पावसाळ्यात वाहनचालकांना हे खड्डे दिसत नाहीत, ज्यामुळे दुचाकी किंवा चारचाकी वाहने थेट खड्ड्यात कोसळून भीषण अपघात होण्याची दाट शक्यता आहे.

**प्रशासकीय 'टोलवाटोलवी'चा खेळ**

या संदर्भात आम आदमी पार्टीने २१ जानेवारी २०२६ रोजी जागतिक बँक प्रकल्प अधिकारी अभियंता प्रीती पुजारी यांना निवेदन दिले होते. मात्र, त्यावर कोणतीही कारवाई झाली नाही. उलट, हे खड्डे महानगरपालिकेने केले आहेत, आमचा त्याच्याशी संबंध नाही, असे सांगून जबाबदारी झटकण्याचा प्रयत्न अधिकाऱ्यांनी केला. दुसरीकडे महानगरपालिका प्रशासन हे काम जागतिक बँक प्रकल्पाचे असल्याचे सांगत आहे. या 'तू-तू मै-मै' मध्ये सामान्य नागरिकाचा जीव टांगणीला लागला आहे.

**'आप'चा निर्वाणीचा इशारा**

आज २ फेब्रुवारी २०२६ रोजी 'आप'च्या वतीने पुन्हा एकदा स्मरणपत्र देण्यात आले. यावेळी कार्यकर्त्यांनी अधिकाऱ्यांना खडे बोल सुनावले:

जर या खड्ड्यामुळे एखाद्याचा मुलगा, वडील किंवा भाऊ दगावला, तर त्याच्या उद्ध्वस्त होणाऱ्या कुटुंबाची जबाबदारी कोण घेणार?



तुमच्या या तांत्रिक कारणांमुळे कोणाचे कुटुंब उध्वस्त होऊ देऊ नका. भविष्यात येथे अपघात झाल्यास संबंधित अधिकारीच त्याला जबाबदार असतील. जनतेच्या प्रश्नासाठी आम आदमी पार्टीचे नेते दत्तू पवार, महिला जिल्हाध्यक्ष मेघा राईकवार, प्रकाश विश्वकर्मा, प्रतिभा भालेराव व इतर कार्यकर्त्यांनी आक्रमक पवित्रा घेत हे निवेदन दिले आहे.

रस्ते चकाचक करण्याच्या गप्पा मारणारे प्रशासन, साधे जीवघेणे खड्डे बुजवण्यासाठी एखाद्या मोठ्या दुर्घटनेची वाट पाहत आहे का? आता तरी या कुंभकर्णी झोपेत असलेल्या प्रशासनाला जाग येईल का, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

# केंद्राच्या १०० मीटर परिसरात 'नो एन्ट्री'; जिल्हाधिकाऱ्यांचे कडक आदेश

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी/** जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीचा निकाल सोमवारी, दिनांक ९ रोजी जाहीर होणार आहे. मतमोजणीची ही संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक आणि सुरक्षित वातावरणात पार पडावी, यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी दिलीप स्वामी यांनी मतमोजणी केंद्रांच्या १०० मीटर परिसरात कडक मनाई आदेश जारी केले आहेत.

**जि.प. व पंचायत समिती मतमोजणी:**

परिसरात 'या' गोष्टींवर असेल बंदी

प्रशासनाने दिलेल्या आदेशानुसार, मतमोजणी केंद्राच्या १०० मीटर परिघात खालील बाबींना पूर्णतः प्रतिबंध असेल:

वाहने आणि मोबाईल: कोणत्याही खासगी व्यक्तीला या परिसरात वाहन किंवा मोबाईल फोन घेऊन जाण्यास सक्त मनाई आहे.

ध्वनिक्षेपक: परिसरात शांतता राखण्यासाठी ध्वनिक्षेपकांचा वापर बंद ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.अनधिकृत प्रवेश: विनापरवाना कोणत्याही व्यक्तीला केंद्रात प्रवेश मिळणार नाही.

कोणाला मिळणार प्रवेश?

मतमोजणी केंद्रात केवळ खालील अधिकृत व्यक्तींनाच प्रवेशाची परवानगी असेल: १. मतमोजणीसाठी नियुक्त केलेले अधिकारी आणि कर्मचारी. २. बंदोबस्तावरील पोलीस अधिकारी व कर्मचारी. ३. निवडणूक लढवणारे उमेदवार आणि त्यांचे अधिकृत प्रतिनिधी. ४. निवडणूक आयोगाने किंवा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी प्राधिकृत केलेल्या व्यक्ती.

आदेशाचा कालावधी



हे मनाई आदेश सोमवार, दिनांक ९ रोजी सकाळी ७ वाजेपासून लागू होतील. मतमोजणीची संपूर्ण प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत आणि निकाल जाहीर होऊन परिसर रिकामा होईपर्यंत हे आदेश अंमलात राहतील.जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी स्पष्ट केले आहे की, निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता राखण्यासाठी आणि कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून हे पाऊल उचलण्यात आले आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक कायदेशीर कारवाई करण्याचे संकेतही प्रशासनाने दिले आहेत.

## संक्षिप्त

### छत्रपती संभाजीनगर: संत रोहिदास जयंतीनिमित्त सामाजिक न्याय विभागात अभिवादन

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** समता आणि मानवतेचा संदेश देणारे महान संत रोहिदास यांची जयंती आज छत्रपती संभाजीनगर येथे उत्साहात साजरी करण्यात आली. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत असलेल्या संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाच्या विभागीय कार्यालयात विशेष अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाप्रसंगी सामाजिक न्याय विभागाचे प्रादेशिक उपायुक्त दीपक खरात आणि विभागीय अधिकारी अरुण राऊत यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी संत रोहिदास यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन करण्यात आले.

**प्रशासकीय उपस्थिती आणि उत्साह**

या अभिवादन सोहळ्याला महामंडळातील तसेच सामाजिक न्याय विभागातील विविध अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संत रोहिदास यांनी आपल्या कार्यातून दिलेला समतेचा आणि कष्टाचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला. महामंडळाच्या माध्यमातून चर्मकार समाजाच्या विकासासाठी राबवल्या जाणाऱ्या योजनांचा लाभ गरजूंपर्यंत पोहोचवणे हीच संत रोहिदास यांना खरी श्रद्धांजली ठरेल, अशा भावना यावेळी व्यक्त झाल्या.कार्यक्रमाच्या शेवटी सामाजिक न्याय विभागाच्या वतीने उपस्थित सर्वांचे आभार मानण्यात आले.

# 'चांगलं खा, चांगलं व्हा'; जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांचा विद्यार्थ्यांना आरोग्यमंत्र

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी/** शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्य उत्तम राखण्यासाठी आपली दिनचर्या आणि आहार सकस असणे आवश्यक आहे. सुदृढ आरोग्य लाभलेली पिढीच देशाच्या विकासात मोलाचे योगदान देऊ शकते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी जंक फूड टाळून 'चांगलं खा आणि चांगलं व्हा', असा मौलिक संदेश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज विद्यार्थ्यांना दिला.एमआयटी हायस्कूल (सिडको, एन-४) येथे आयोजित 'संस्कार दशसूत्री' उपक्रमांतर्गत आरोग्य समुपदेशन कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांशी संवाद साधत आरोग्याचे महत्त्व पटवून दिले.

**आईच्या हाताची भाकरी हाच खरा 'सुपरफूड'**

कार्यक्रमात बोलताना जिल्हाधिकारी म्हणाले की, बाजारात मिळणारे आकर्षक पॅकिंगमधील जंक फूड, फास्ट फूड आणि कोल्ड ड्रिंक्स शरीरासाठी अत्यंत घातक आहेत. या पदार्थांच्या मोहात न पडता आईने घरी बनवलेली भाजी-चपाती आणि भाकरी हेच खरे पौष्टिक अन्न आहे. विद्यार्थ्यांनी सक्षम भविष्यासाठी आजपासूनच आपल्या खाण्यापिण्याच्या सवयी सुधारण्याचे आवाहन त्यांनी केले.

हजारो विद्यार्थ्यांनी घेतली आरोग्याची शपथ

या कार्यक्रमासाठी परिसरातील एमआयटी हायस्कूलसह महर्षी विद्यालय, संत मीरा विद्यालय आणि आनंद विद्यामंदिर या शाळांमधील सुमारे एक हजार विद्यार्थी उपस्थित होते. या सर्व विद्यार्थ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत आरोग्यविषयक नियमांचे पालन करण्याची शपथ घेतली.




२२२४ शाळांमध्ये आरोग्य क्रांती

'संस्कार दशसूत्री' अंतर्गत सुरू असलेल्या या विशेष मोहिमेने जिल्ह्याभरात मोठे स्वरूप धारण केले आहे. २८ तारखेपासून सुरू झालेल्या या उपक्रमाची व्याप्ती खालीलप्रमाणे आहे:

एकूण शाळा: २२२४ शाळांमध्ये समुपदेशन पूर्ण.

शहरी भाग: ४७५ शाळांमधील १ लाख २ हजार ५२२ विद्यार्थी आणि २,८४३ शिक्षकांचा सहभाग,ग्रामीण भाग: १५४२ शाळांमधील २ लाख ३४ हजार ७०८ विद्यार्थी आणि ५,३१२ शिक्षकांचा सहभाग,आजचा टप्पा: शहरातील २०७ शाळांमध्ये आरोग्य शिबिरे यशस्वीरीत्या संपन्न झाली.

या प्रसंगी महानगरपालिका आरोग्य अधिकारी डॉ. पारस मंडलेचा आणि डॉ. मेघा जोगदंड यांनीही विद्यार्थ्यांना आरोग्य व दिनचर्या यावर मार्गदर्शन केले. व्यासपीठावर शिक्षणाधिकारी आश्विनी लाठकर, आयएमए अध्यक्ष डॉ. अनुप टाकळकर, डॉ. पूजा करोले, शिक्षण विस्तार अधिकारी मनीषा वाशिंबे, कल्पना पदकोंडे यांच्यासह विविध शाळांचे मुख्याध्यापक संजय वानखेडे, अनिल पाटील, श्रीमती उषा मालोदे आणि गणेश मालोदे उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक मनीषा वाशिंबे यांनी केले, सूत्रसंचालन कविता रगडे यांनी केले तर मुख्याध्यापक संजय वानखेडे यांनी आभार मानले.

## जि.प. आणि पं.स. निवडणूक: मतदानासाठी ७ तारखेचे सर्व आठवडी बाजार बंद; जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी/** जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकांसाठी येत्या शनिवार, ७ तारखेला मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. लोकशाहीच्या या उत्सवात प्रत्येक मतदाराला आपला मतदानाचा हक्क विनासायास बजावता यावा, यासाठी जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी ७ तारखेला जिल्ह्यातील सर्व आठवडी बाजार बंद ठेवण्याचे आदेश जारी केले आहेत.

निवडणुकीच्या दिवशी ग्रामीण भागात मोठी गर्दी असते. आठवडी बाजारांमुळे होणारी गर्दी आणि वाहतुकीची कोंडी यामुळे मतदानावर परिणाम होऊ शकतो. हे टाळण्यासाठी खालील कारणांमुळे हा निर्णय घेण्यात आला आहे:

मतदानाची टक्केवारी वाढवणे: बाजाराच्या कामात व्यस्त राहिल्यामुळे अनेक मतदार मतदानापासून वंचित राहतात. बाजार बंद राहिल्याने त्यांना मतदान केंद्रावर जाण्यासाठी वेळ मिळेल.

शांतता व सुव्यवस्था: मतदान प्रक्रिया शांततेत आणि पारदर्शक पद्धतीने पार पडण्यासाठी पोलीस प्रशासन आणि निवडणूक यंत्रणेवर अतिरिक्त ताण येऊ नये.

वाहतूक कोंडीवर नियंत्रण: बाजारासाठी येणाऱ्या वाहनांमुळे मतदान केंद्रांकडे जाणाऱ्या मार्गांवर अडथळा निर्माण होऊ नये.

जिल्हाधिकाऱ्यांनी आपल्या आदेशात स्पष्ट केले आहे की, शनिवार दि. ७ रोजी जे आठवडी बाजार रद्द करण्यात आले आहेत, ते बाजार दुसऱ्या कोणत्याही सोयीच्या दिवशी भरवण्यात यावेत. यामुळे व्यापारी आणि नागरिकांचे आर्थिक नुकसान टाळता येईल.

महत्त्वाची टीप: या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर प्रशासनाकडून कडक कारवाई करण्यात येईल, असेही सूचित करण्यात आले आहे. सर्व नागरिकांनी आणि व्यापाऱ्यांनी प्रशासनाला सहकार्य करून मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## क्षयरोगाच्या समूळ उच्चाटनासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे; जिल्हाधिकारी आशिमा मित्तल य

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी/** 'टीबीमुक्त भारत' हे स्वप्न साकार करण्यासाठी जिल्ह्यात राबविल्या जाणाऱ्या उपक्रमांत गती आणून क्षयरोगाचे समूळ उच्चाटन करण्यासाठी सर्व विभागांनी परस्पर समन्वयाने काम करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिले.जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात आयोजित 'जिल्हास्तरीय टी.बी. फोरम'च्या बैठकीत त्या बोलत होत्या. यावेळी जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. गोपाल कुडलीकर, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. जयश्री भुसारे यांच्यासह सर्व तालुक्यांचे आरोग्य अधिकारी आणि संबंधित यंत्रणेचे प्रमुख उपस्थित होते. जिल्हाधिकाऱ्यांनी नमूद केले की, गेल्या वर्षीच्या तुलनेत जिल्ह्यात क्षयरुग्णांचे प्रमाण कमी झाले असून मृत्यूदरही घटला आहे.यरोग हा पूर्णपणे बरा होणारा आजार असल्याने आरोग्य विभागाने अधिकाधिक जनजागृती करावी.जागतिक क्षयरोग दिन (२४ मार्च): या दिवशी व्यापक जनजागृती कार्यक्रम राबवावेत.सरपंचांचा गौरव: टीबीमुक्त ग्रामपंचायतींच्या १० सरपंचांचा या दिवशी विशेष सन्मान करून त्यांना प्रोत्साहित करावे.नियमित तपासणी: सक्रिय क्षयरुग्णांची एचआयव्ही आणि आरबीएस तपासणी वेळोवेळी करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.'प्रधानमंत्री टीबीमुक्त भारत' उपक्रमांतर्गत 'निक्षय मित्र' योजनेद्वारे रुग्णांना पोषण आहार दिला जातो.गतवर्षीचे कार्य: २०२५ मध्ये कलश सीड्स, मार्केट कमिटी जालना आणि गजलक्ष्मी स्टील यांच्या सहकार्याने ९४० पोषण किटचे वाटप करण्यात आले.२०२६ मध्ये २२५० क्षयरुग्णांचे उद्दिष्ट असून पुढील सहा महिन्यांसाठी साधारण १३,५०० कोरडा पोषण आहार किटची आवश्यकता आहे. यासाठी जिल्ह्यातील दानशूर व्यक्ती आणि संस्थांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले.

# महाशिवरात्रीला घृष्णेश्वराचे दर्शन 'बाहेरूनच'; गाभाऱ्यात प्रवेशबंदी, प्रशासनाचा कडक पवित्रा!

**आत्ताच एक्सप्रेस**

**वेरूळ (खुलताबाद)/प्रतिनिधी/** १२ वे ज्योतिर्लिंग असलेल्या घृष्णेश्वर मंदिरात महाशिवरात्रीला होणारी भाविकांची अलोट गर्दी आणि संभाव्य चेंगराचेंगरी टाळण्यासाठी जिल्हा प्रशासनाने यंदा अत्यंत कठोर पावले उचलली आहेत. यंदा गाभारा दर्शन नाहीच, असा स्पष्ट आणि आक्रमक पवित्रा जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी घेतला असून, भाविकांना केवळ मुखदर्शनावर समाधान मानावे लागणार आहे.

मंगळवारी (दि. ३) वेरूळ येथे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या उच्चस्तरीय आढावा बैठकीत हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. या निर्णयामुळे यंदा दर्शनाचे स्वरूप पूर्णतः बदललेले पाहायला मिळणार आहे.

प्रशासनाचे कडक निर्बंध:




काय बदलणार?

१२ व्या ज्योतिर्लिंगाच्या चरणी लीन होण्यासाठी देशभरातून लाखो भाविक वेरुळमध्ये दाखल होतात. ही गर्दी नियंत्रणाबाहेर जाऊ नये म्हणून प्रशासनाने खालील नियम लागू केले आहेत:

गाभारा बंदी: भाविकांना गाभाऱ्यात जाऊन शिवलिंगाला स्पर्श करता येणार नाही. गाभाऱ्याच्या बाहेरूनच दर्शन घ्यावे लागेल.

चंदनाच्या लेपनावर बंदी: शिवलिंगावर चंदनाचा पाले (लेप) लावण्यास यावर्षी सक्त मनाई करण्यात आली आहे.

**एकल दर्शन रांग** (Single Queue): गर्दीचा गोंधळ टाळण्यासाठी केवळ एकच दर्शन रांग असेल. व्हीआयपी संस्कृतीला फाटा देऊन सामान्य भाविकांच्या सुविधेला प्राधान्य देण्यात आले आहे.

प्रसाद वाटपाचे ठिकाण बदलले: मंदिर परिसरात गर्दी साचू नये म्हणून प्रसादाचे वाटप केवळ प्रवेशद्वाराजवळच करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.या आढावा बैठकीला जिल्हाधिकारी स्वामी यांच्यासह पोलीस अधीक्षक (ग्रामीण) विनयकुमार राठोड, उपविभागीय अधिकारी संतोष गोरड, तहसीलदार संतोष गुट्टे आणि आरोग्य विभागाचे डॉ. अभय धानोरकर उपस्थित होते.

प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, कोणत्याही प्रकारची शिथिलता खपवून घेतली जाणार नाही.

पुरातत्व विभागाचे राजेश वाकलेकर आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अभियंत्यांनाही परिसरातील सुरक्षा आणि सोयीसुविधांबाबत विशेष सूचना देण्यात आल्या आहेत.

**भाविकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर**

मंदिर देवस्थान ट्रस्टचे उपाध्यक्ष योगेश टोपरे आणि विश्वस्तांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या बैठकीत, गर्दी व्यवस्थापन हाच मुख्य मुद्दा राहिला. भाविकांची सुरक्षा हीच आमची प्राथमिकता आहे, असे जिल्हाधिकाऱ्यांनी ठणकावून सांगितले.

स्थानिक पोलीस प्रशासन आणि ग्रामपंचायत प्रशासनानेही आता कंबर कसली असून महाशिवरात्रीच्या पार्श्वभूमीवर वेरुळ नगरीला छावणीचे स्वरूप प्राप्त होणार आहे.

# टाकळी येथील शिवेश्वर विदयालयात टाकाऊ पासून टिकाऊ वस्तू बनवणे कार्यशाळा

**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड / प्रतिनिधी/** कन्नड तालुक्यातील शिवेश्वर माध्यमिक विद्यालय टाकळी येथे मंगळवार रोजी सामाजिक वनीकरण छ. संभाजी नगर, संदिप गिरी साहेब (विभागीय वन अधिकारी), अरविंद काटकर साहेब( वनपरिक्षेत्र अधिकारी छ. संभाजीनगर) सोनिया शिंदे (सहाय्यक वनसंरक्षक अधिकारी) व शिवेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय टाकळी अंतुर चे प्राचार्य संदिप पाटील मा. जि प सदस्य यांच्या मार्गदर्शनाखाली सामाजिक वनीकरण विभाग अंतर्गत राष्ट्रीय हरित सेनेने टाकाऊ वस्तु पासून टिकाऊ वस्तू बनवण्याची कार्यशाळा घेण्यात आली. त्यात विद्यार्थ्यांनी नारळ करवंटी, कागद पुठ्ठा ,कापड ,डबे ,घरगुती टाकाऊ वस्तु पासून सुंदर कापडी व कागदी पिशवी, पर्स ,छोटी पिशवी, फुलदाणी, झाडांसाठी कुंडी, पक्षांची घरटी, शोभिवंत पेन स्टॅन्ड, ब्रश स्टॅन्ड, दुरडी, टोपली, कप ,चहाचे ट्रे, कागदी फुले, पाने ,कापडी पायपुसणी, वॉल हैंगिंनारळाची पंचपाळ, फोटो फ्रेम, घरे, खोपे ,आधी कलाकृती बनवल्या त्यानंतर या कलाकृतींचे प्रदर्शन रुपाली राठोड ( वनरक्षक कन्नड )यांनी निरीक्षण केले. तसेच शाळेचे उपमुख्याध्यापक अशोक सपाटे , शिक्षिका लता श्रीमती विधाटे तसेच विषय मागदर्शक श्री संतोष सुस्ते एकनाथ ढोमसे तसेच सर्व शिक्षकांनी या कलाकृतींचे निरीक्षण केले. या उपक्रमात अनेक विद्यार्थी सहभागी होते .तसेच महत्त्व श्री एकनाथ ढोमसे यांनी समजून सांगितले .



शक्यतो जीवजनात प्लास्टिकचा वापर करू नये, कारण त्यामुळे आरोग्यास हानी होते. आणि केल्यास त्याचे दुष्परिणाम होणार , याची काळजी घ्यावी यासाठी त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच शाळेचे उपमुख्याध्यापक श्री अशोक सपाटे सर यांनीही विद्यार्थ्यांना अधिक माहिती दिली.या कार्यक्रमासाठी सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# जालना जिल्हा परिषदेत गुत्तेदाराची दादागिरी; पत्रकाराला अर्वाच्य भाषेत शिवीगाळ अन् धक्काबुक्की!

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी/** जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागात बातमीच्या संदर्भात माहिती घेण्यासाठी गेलेले 'दैनिक जनश्वास'चे संपादक भरत मानकर यांना एका गुत्तेदाराने अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करत धक्काबुक्की केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

या घटनेमुळे जिल्हा परिषद वर्तुळात मोठी खळबळ उडाली असून, संबंधित गुत्तेदारावर कठोर कायदेशीर कारवाई करण्यासह त्याला 'टीप' पुरवणाऱ्या भ्रष्ट कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कुऱ्हाड चालवण्याची मागणी आता जोर धरत आहे.सोमवार, २ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी १ ते १:३० च्या सुमारास भरत मानकर हे बांधकाम विभागातील सहाय्यक लेखाधिकारी हारुण यांच्या दालनात बसले होते. यावेळी त्या ठिकाणी 'बांगड' नावाचा गुत्तेदार अचानक आला. मानकर हे बातमीसाठी अधिकृत माहिती गोळा करत असल्याचे समजताच या गुत्तेदाराचा संयम सुटला. त्याने कोण पत्रकार आहे? असे म्हणत अत्यंत खालच्या पातळीवर जाऊन गलिच्छ भाषेत शिवीगाळ सुरू केली.

**माहिती पुरवणाऱ्या 'त्या' कर्मचाऱ्याचे निलंबन करा; संपादक भरत मानकर यांची मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे धाव**

एवढ्यावरच न थांबता, आमच्या कामाचे बिल रोखण्याचा प्रयत्न करतोय, याचे हातपाय तोडून टाकू, याला लय मस्ती आली आहे, अशा उघड धमक्या देत त्याने मानकर यांना धक्काबुक्की केली. शासकीय कार्यालयातच पत्रकारावर झालेल्या या हल्ल्यामुळे कर्मचाऱ्यांमध्येही भीतीचे वातावरण पसरले आहे.

**प्रशासनातील 'घरभेदी' कोण?**

या घटनेमुळे जिल्हा परिषदेतील गोपनीयतेवर मोठे प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. एखादा पत्रकार शासकीय कार्यालयात माहिती घेण्यासाठी आला आहे, ही माहिती तात्काळ संबंधित गुत्तेदारापर्यंत पोहोचतेच कशी? असा संतप्त सवाल विचारला जात आहे. बांधकाम विभागातील कोणत्या कर्मचाऱ्याने किंवा अधिकाऱ्याने ही माहिती गुत्तेदाराला पुरवून चिथावणी दिली, याची सखोल चौकशी करण्याची मागणी होत आहे.

पत्रकार माहिती घेत असताना गुत्तेदाराला बोलावून आणणारे 'घरभेदी' कर्मचारीच या भ्रष्टाचाराचे खरे सूत्रधार आहेत. अशा कर्मचाऱ्यांना तात्काळ निलंबित करावे. - भरत मानकर, संपादक, दैनिक जनश्वास

**मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे तक्रार**

या गंभीर प्रकारानंतर भरत मानकर यांनी थेट जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) यांची भेट घेऊन त्यांना लेखी निवेदन दिले. संबंधित गुत्तेदाराच्या सर्व कामांची तातडीने चौकशी करावी आणि त्याला माहिती पुरवणाऱ्या कर्मचाऱ्याचे निलंबन करावे, अशी मागणी त्यांनी केली आहे.

तसेच, या प्रकरणी कदीम जालना पोलीस ठाण्यात पत्रकार संरक्षण कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

संबंधित गुत्तेदाराने केलेल्या कामांमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता आणि भ्रष्टाचार झाल्याची शक्यता वर्तवली जात आहे.

आपले काळे कारनामे उघड होतील, या भीतीपोटीच त्याने पत्रकारावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला असावा, असा संशय व्यक्त केला जात आहे. त्यामुळे या गुत्तेदाराने आतापर्यंत केलेल्या सर्व कामांचे ऑडिट करण्याची मागणी आता पत्रकार वर्तुळातून केली जात आहे.

# यशाच्या शिखराकडे झेप घ्या! 'एक्सलेन्स एज्युकेयर'तर्फे दहावीच्या विद्यार्थ्यांना शाही निरोप



**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी/**दहावीची परीक्षा म्हणजे विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील पहिला महत्त्वाचा टप्पा. हाच टप्पा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी सज्ज झालेल्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी, जालना शहरातील नामांकित 'एक्सलेन्स एज्युकेयर' क्लासेसच्या वतीने स्थानिक सेफरॉन हॉटेलमध्ये एका दिमाखदार निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. अभ्यासाच्या तणावातून मुक्त होत विद्यार्थ्यांनी या सोहळ्यात उत्साहाने सहभाग नोंदवला.

केवळ अभ्यासच नव्हे तर कलागुणांनाही वाव देणाऱ्या या संस्थेने विद्यार्थ्यांसाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले होते. विद्यार्थ्यांनी बॉलीवूड आणि लोकगीतांच्या तालावर 'बहारदार नृत्य' सादर करून उपस्थितांच्या डोळ्यांचे पारणे फेडले. गायन आणि नृत्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी आपल्या भावनांना वाट मोकळी करून दिली, ज्यामुळे संपूर्ण हॉल टाळ्यांच्या कडकडाटाने दुमदुमून गेला होता.

यशाचा 'गुरुमंत्र' आणि सविस्तर मार्गदर्शन

कार्यक्रमाच्या उत्तरार्धात मार्गदर्शन करताना संचालकांनी विद्यार्थ्यांमध्ये नवा आत्मविश्वास फुकला.संचालक शैलेश ठक्कर व भूषण देवीदान: त्यांनी विद्यार्थ्यांना परीक्षेच्या काळात वेळेचे नियोजन कसे करावे आणि आत्मविश्वासाने पेपर कसा सोडवावा, याचे सविस्तर मार्गदर्शन केले. तुमची मेहनत आणि सातत्यच तुम्हाला यशाच्या शिखरापर्यंत पोहोचवेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

शिक्षक नवीन मोर: त्यांनी परीक्षेसंबंधी तांत्रिक बाबी आणि शेवटच्या क्षणी उजळणी कशी करावी, याबद्दल मोलाच्या टिप्स दिल्या.

या सोहळ्याला जान्व्ही ठक्कर, सोनाली देवीदान, कृष्णा शिराळे, डॉ. हिरल गणात्रा, सुरभी सकलेजा आणि प्रिया बदनापूरकर यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी शुभेच्छा देऊन त्यांचे कौतुक करण्यात आले.कार्यक्रमाच्या शेवटी, विद्यार्थ्यांनी आपल्या लाडक्या शिक्षकांसोबत फोटो आणि सेल्फी काढून हा सोहळा स्मृतीपटलावर कायमचा कोरला. मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या विद्यार्थ्यांनी आम्ही नक्कीच यश संपादन करू असा निर्धार यावेळी व्यक्त केला.

# जालना जिल्ह्यात 'अजितपर्व'च्या स्मृतींचा महासागर; उद्या निघणार भव्य अस्थिकलश दर्शन मिरवणूक!

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी/**महाराष्ट्राच्या राजकारणातील एक झंझावात, जनसामान्यांचे नेते आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष स्व. अजितदादा पवार यांच्या निधनाने निर्माण झालेली पोकळी अद्याप भरून निघालेली नाही. आपल्या लाडक्या नेत्याला अखेरचा निरोप देण्यासाठी आणि त्यांच्या स्मृतींना वंदन करण्यासाठी उद्या, बुधवार, ४ फेब्रुवारी २०२६ रोजी जालना जिल्हा सज्ज झाला आहे. उद्या शहरासह ग्रामीण भागात दादांच्या अस्थिकलशाची भव्य दर्शन मिरवणूक निघणार असून, संपूर्ण जिल्ह्याचे वातावरण भावूक झाले आहे.





जालना जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस परिवाराच्या वतीने या अस्थिकलश यात्रेचे जय्यत नियोजन करण्यात आले आहे. उद्या सकाळी ११:३० वाजता जालना येथील जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी कार्यालयापासून या यात्रेचा प्रारंभ होईल. ही यात्रा केवळ एक कार्यक्रम नसून दादांच्या कार्याप्रती असलेली कृतज्ञता व्यक्त करणारा एक 'जनसागर' ठरेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.यात्रेचा प्रमुख मार्ग:सुरुवात: जिल्हा राष्ट्रवादी कार्यालय (सकाळी ११:३०) शहर मार्ग: मम्मादेवी ➜ गांधीचमन ➜ शनिमंदिर (जुना जालना) ➜ नुतन वसाहत ➜ अंबड चौफुली.ग्रामीण मार्ग: इंद्रेवाडी ➜ अंतरवाला ➜ गोलापांगरी ➜ शेवगा ➜ पारनेर फाटा.समारोप: ही यात्रा अंबड शहरातून मार्गक्रमण करत शहापूर, ढाकलगाव, वडीगोद्री, महाकाळा मार्गे शहागड येथे पोहोचेल.

**दोन्ही गटांची ऐतिहासिक एकजूट?**

या अस्थिकलश यात्रेचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे आयोजकांनी केलेले आवाहन. अजित पवार गट आणि शरद पवार गट अशा दोन्ही बाजूंच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी आणि समर्थकांनी मतभेद विसरून आपल्या लाडक्या नेत्याला आदरांजली वाहण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. दादांच्या आठवणींना उजाळा देण्यासाठी संपूर्ण राजकीय शक्ती एकवटल्याचे चित्र उद्या पाहायला मिळण्याची शक्यता आहे.

**गोदावरीच्या पात्रात होणार अस्थिविसर्जन**

दिवसभर चालणाऱ्या या भावूक यात्रेचा समारोप दुपारी ३:०० वाजता अंबड तालुक्यातील शहागड येथील पवित्र गोदावरी नदीच्या पात्रात होणार आहे. येथे विधिवत पूजन करून दादांच्या अस्थींचे विसर्जन करण्यात येईल.अजितदादांनी जिल्ह्याच्या विकासासाठी दिलेले योगदान कधीही विसरता येणार नाही. हा अस्थिकलश केवळ एक कलश नसून आमच्यासाठी तो प्रेरणेचा स्रोत आहे. शिस्तबद्ध पद्धतीने आणि मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपण आपल्या नेत्याला मानवंदना देऊया.

**- आयोजक, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, जालना.**

ठळक वैशिष्ट्ये:शहरात ठिकठिकाणी आदरांजलीचे फलक आणि पुष्पवृष्टीची तयारी.हजारो वाहनांच्या ताफ्यासह कार्यकर्त्यांचा सहभाग निश्चित. पोलिस प्रशासनाकडून वाहतुकीचे चोख नियोजन.उद्याचा दिवस जालना जिल्ह्यासाठी अत्यंत भावूक आणि ऐतिहासिक ठरणार आहे. आपल्या 'दादां'ना निरोप देण्यासाठी जनसामान्यांची पावले आता शहागडच्या दिशेने वळू लागली आहेत.

# मुलांना आळशी नको, स्वावलंबी बनवा; प्राचार्य डॉ. गणेशजी अग्निहोत्री यांचे पालकांना जाहीर आवाहन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी/**आजच्या धावपळीच्या युगात पालक कळत-नकळत आपल्या पाल्यांना आळशी आणि परस्परावलंबी बनवत आहेत. मुलांना संकटांपासून दूर ठेवण्यापेक्षा, त्यांना स्वतः च्या प्रश्नांना धैर्याने सामोरे जाण्याची सवय लावा, असे परखड मत जेईएस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेशजी अग्निहोत्री यांनी व्यक्त केले. जालना येथील श्री एम.एस. जैन इंग्लिश स्कूल आयोजित 'भारत कल, आज और कल' या वार्षिक स्नेहसंमेलनात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

**जालन्यातच आहे जागतिक दर्जाचे शिक्षण**

डॉ. अग्निहोत्री यांनी पुढे बोलताना पालकांचा एक मोठा भ्रम दूर केला. ते म्हणाले की, उच्च शिक्षणासाठी केवळ बाहेरच्या शहरांकडे धाव घेण्याची गरज नाही. जालन्यामध्येच उत्कृष्ट दर्जाचे शिक्षण उपलब्ध असून, येथील संधींचा लाभ घेऊन विद्यार्थी जागतिक स्तरावर प्रगती करू शकतात, असा ठाम विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

'कुछ पाने के लिए कुछ करना पडता है' चा नवा मंत्र

कार्यक्रमात उपस्थित श्री व. स्था. जैन श्रावक संघाचे उपाध्यक्ष श्री भरतजी गादिया यांनी विद्यार्थ्यांना यशाचा नवा मंत्र दिला. काही मिळवण्यासाठी काही गमवावे लागते (कुछ पाने के लिए कुछ खोना पडता है) ही जुनी संकल्पना आता मागे पडली आहे. आताच्या काळात 'कुछ पाने के लिए कुछ करना पडता है' ही वृत्ती जोपासणे गरजेचे आहे, असे सांगत त्यांनी कष्टाचे महत्त्व अधोरेखित केले.

**रंगारंग सांस्कृतिक कार्यक्रमांनी जिंकली मने**

३१ जानेवारी २०२६ रोजी पार पडलेल्या या सोहळ्यात 'भारत कल, आज और कल' या संकल्पनेवर आधारित विविध कार्यक्रम सादर करण्यात आले. पूर्व प्राथमिक ते १० वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी:विविध देशभक्तीपर आणि प्रेरणादायी गीतांवर नृत्ये सादर केली.भारताचा गौरवशाली इतिहास आणि उज्ज्वल भविष्याचे दर्शन घडवले.रंगारंग सादरीकरणाने उपस्थित पालकांच्या आणि प्रेक्षकांच्या डोळ्यांचे पारणे फेडले.

याप्रसंगी शैक्षणिक वर्षात घवघवीत यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री सुदेशकुमारजी सकलेचा (अध्यक्ष, श्री व. स्था. जैन श्रावक संघ) होते. तसेच व्यासपीठावर गोसेवक श्री चंद्रप्रकाशजी सकलेचा, शालेय समितीचे अध्यक्ष श्री संजयजी रुणवाल, सचिव श्री राजकुमारजी रुणवाल यांच्यासह जैन श्रावक संघाचे सर्व



पदाधिकारी, सदस्य आणि मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. सीमा एस. कुलकर्णी, प्रशासकीय अधिकारी सौ. शोभना गोयल, श्री एम. एस. जैन मराठी माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक श्री. शांतिलालजी वानगोटा यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. मुख्याध्यापिका सौ. कुलकर्णी यांनी शेवटी सर्व मान्यवर आणि पालकांचे आभार मानले.

# शून्यातून विश्व निर्माण करणारी 'पद्मशाली कन्या' आता नाशिकची शिक्षणाधिकारी!

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी/** जिद्द असेल तर परिस्थितीचे डोंगरही भुईसपाट करता येतात, हे जालना शहराच्या मातीतील एका लेकीने सिद्ध करून दाखवले आहे. जालना शहरातील रामनगर विणकर कॉलनीसारख्या सामान्य परिसरातून आलेल्या आणि संघर्षाचे बाळकडू घेतलेल्या सौ. साईलता कृष्णा सामलेटी (सौ. साईलता नितीन रायपल्ली) यांची नाशिक जिल्हा परिषद प्राथमिक विभागाच्या 'शिक्षणाधिकारी' पदी पदोन्नती झाली आहे. त्यांच्या या निवडीने संपूर्ण पद्मशाली समाजासह जालना जिल्ह्याची मान अभिमानाने उंचावली आहे.

**वडिलांचा वारसा: शून्यातून शिखराकडे!**

साईलता सामलेटी यांच्या यशाची मुळे त्यांच्या वडिलांच्या संघर्षात रुजलेली आहेत. त्यांचे वडील स्व. कृष्णा अंबय्या सामलेटी यांनी अत्यंत हलाखीत, लहानपणी बिडी कामगार म्हणून काम करत स्वतःचे शिक्षण पूर्ण केले. पॉवरलूममध्ये सुपरवायझरची नोकरी करत त्यांनी बी.एस्सी., बी.एड. पर्यंत मजल मारली आणि स्वतःच्या पत्नीलाही (साईलता यांच्या मातोश्रींना) डी.एड. साठी प्रोत्साहित केले. आई-वडिलांच्या याच 'लढाऊ' वृत्तीचा वारसा घेत सौ. साईलता यांनी यशाला गवसणी घातली आहे.



असा राहिलाय 'रणांगणा'सारखा प्रवास:

सौ. साईलता यांचा प्रवास हा केवळ नोकरीचा नसून तो एका ध्येयवेड्या महिलेचा संघर्ष आहे.

२००० - २०१४: जिल्हा परिषद शिक्षिका म्हणून देवपिंपळगाव आणि श्रीरामपूर येथे शैक्षणिक क्रांतीची सुरुवात.

२०१४: संकटांवर मात करत MPSC परीक्षेत यश आणि उपशिक्षणाधिकारी पदी निवड.

प्रशासकीय धडाका: नेवासा, संगमनेर आणि श्रीरामपूर येथे 'गटशिक्षणाधिकारी' म्हणून काम करताना डिजिटल शिक्षण, पटसंख्या वाढ आणि शाळा गळती थांबवण्यासाठी त्यांनी प्रशासकीय यंत्रणेला धावते केले.

सामान्य कुटुंबातील मुलगी जर ठरवलं, तर शिक्षणाच्या जोरावर सत्तेच्या आणि प्रशासनाच्या सर्वोच्च खुर्चीवर बसू शकते, हे साईलता सामलेटी यांनी आज जगाला दाखवून दिले आहे.

त्यांच्या या प्रवासात त्यांना पती नितीन दत्तात्रय रायपल्ली (हायस्कूल शिक्षक, श्रीरामपूर), अमेरिकेत असलेले इंजिनिअर बंधू राजू सामलेटी आणि समाजसेवक आशिष (सोनू) सामलेटी यांचे खंबीर पाठबळ लाभले.

एका सामान्य विणकर कुटुंबातून निघालेला हा रथ आज थेट नाशिक जिल्ह्याच्या शिक्षण विभागाचे नेतृत्व करणार आहे.

आजची ही पदोन्नती म्हणजे केवळ एका पदाचा सन्मान नसून, ग्रामीण भागातील त्या प्रत्येक मुलीला दिलेला संदेश आहे की- 'परिस्थिती गरीब असली तरी चालेल, पण स्वप्ने श्रीमंत असावीत!' सौ. साईलता सामलेटी यांचा हा झंझावात येणाऱ्या पिढीसाठी नक्कीच दीपस्तंभ ठरेल.

# ग्राहकांच्या हक्कासाठी आता जालना जिल्हा सरसावणार!

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी/** सामान्य ग्राहकांच्या पिळवणुकीविरुद्ध लढा देणारी अग्रगण्य संघटना 'अखिल भारतीय ग्राहक पंचायत' आता अधिक आक्रमक झाली आहे. संघटनेची बांधणी वज्रमुठीसारखी मजबूत करण्यासाठी आणि आगामी वर्षाची रणनिती आखण्यासाठी येत्या रविवार, ८ फेब्रुवारी २०२६ रोजी सेलू (जि. परभणी) येथे 'देवगिरी प्रांत कार्यकर्ता अभ्यास वर्गा'चे विराट आयोजन करण्यात आले आहे. या वर्गासाठी जालना जिल्ह्यातील प्रत्येक कार्यकर्त्यांने सक्रिय सहभाग नोंदवून आपली ताकद दाखवून द्यावी, असे जाहीर आवाहन जिल्हा कार्यकारिणीने केले आहे.

**सेलू येथील 'देवगिरी प्रांत अभ्यास वर्गा'साठी कार्यकर्त्यांना एल्गार पुकारण्याचे आवाहन**

सेलू येथील नुतन महाविद्यालयाच्या सभागृहात सकाळी ९:३० ते सायंकाळी ५:३० या वेळेत हे मंथन पार पडणार आहे. ग्राहक पंचायतीचे प्रांत अध्यक्ष डॉ. विलास मोरे आणि प्रांत सचिव ओंकार जोशी हे थेट मैदानात उतरून कार्यकर्त्यांना 'सावध ग्राहक' मोहिमेसाठी मार्गदर्शन करणार आहेत. हा केवळ अभ्यास वर्ग नसून, आगामी काळातील आंदोलने आणि संघटनात्मक विस्ताराचा हा एक 'एक्शन प्लॅन' असणार आहे.

या बैठकीचे गांभीर्य लक्षात घेता, प्रशासकीय आणि शिस्तबद्ध कामावर भर देण्यात आला आहे.अनिवार्य उपस्थिती: जिल्हा कार्यकारिणी सदस्य आणि प्रत्येक तालुक्यातील किमान ५ प्रमुख कार्यकर्त्यांना उपस्थित राहणे 'मस्ट' करण्यात आले आहे.

लेखनीची धार: प्रत्येक कार्यकर्त्याने सोबत डायरी आणि पेन आणणे बंधनकारक असून, केवळ चर्चा नको तर कृती आराखडा (action Plan) तयार करण्यावर भर दिला जाणार आहे.अहवाल सादर करणे: मागील काळातील कामाचा लेखी अहवाल जिल्हा/तालुका सचिवांना सादर करावा लागणार आहे. जो काम करेल, तोच संघटनेत टिकेल, असा स्पष्ट संदेश यातून देण्यात आला आहे.

जालना जिल्ह्यातील 'फौज' सज्ज!

जालना जिल्ह्यातून जास्तीत जास्त कार्यकर्ते या क्रांतीकारी वर्गात सामील व्हावेत, यासाठी जिल्हाध्यक्ष रमेश तारगे यांच्या नेतृत्वाखाली एक मोठी फळी सक्रिय झाली आहे. यामध्ये एड. डी.पी.पाटील, एड. मधुकर सोनवणे, एड. महेश धन्नावत, एड. वसीम शेख, श्री. पांडव (Retd. BDO), बालाप्रसाद जेथेलिया, सुरेंद्र पोतदार, मारुती सावंत, कैलास चव्हाण आणि एड. भाले यांसारख्या अनुभवी धुरिणांनी कार्यकर्त्यांना सेलू गाठण्याचे आदेश दिले आहेत.

सध्याच्या काळात ग्राहकांची होणारी फसवणूक आणि ऑनलाइन लुटीच्या विरोधात आवाज उठवण्यासाठी एका प्रशिक्षित फौजेची गरज आहे. ही फौज तयार करण्याचे काम या अभ्यास वर्गात होणार आहे. जिल्हा व तालुका संघटना अधिक 'ॲग्रेसिव्ह' करण्यासाठी हा वर्ग मैलाचा दगड ठरणार आहे.नोंद घ्या: ग्राहक हितासाठी आणि अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी सज्ज असलेल्या प्रत्येक कार्यकर्त्याने ८ फेब्रुवारीला वेळेवर उपस्थित राहावे, असे आवाहन प्रसिद्धी पत्रकाद्वारे करण्यात आले आहे.

# ....त्या गुत्तेदारावर गुन्हा दाखल करण्याची आपची मागणी-सुभाष बोर्डे

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी/**लोकशाहीचा चौथा स्तंभ मानल्या जाणाऱ्या पत्रकारितेवर हल्ले होण्याचे सत्र थांबताना दिसत नाही. जालना जिल्हा परिषद परिसरात बातमीच्या अनुषंगाने माहिती घेण्यासाठी गेलेले 'दैनिक जनश्वास'चे संपादक भरत मानकर यांना एका गुत्तेदाराने अर्वाच्य शिवीगाळ करत, धक्काबुक्की करून जीवे मारण्याची धमकी दिल्याचा खळबळजनक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी संबंधित गुत्तेदारावर पत्रकार संरक्षण कायद्यांतर्गत कठोर कारवाई करण्याची मागणी आम आदमी पार्टीच्या वतीने कदीम जालना पोलीस ठाण्यात निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

यासंदर्भात देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सोमवार दि. २ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी १:०० ते १:३० वाजेच्या सुमारास संपादक भरत मानकर हे जिल्हा परिषद जालना येथील बांधकाम विभागात एका बातमी संदर्भात माहिती घेण्यासाठी गेले होते. ते सहाय्यक लेखाधिकारी श्री. हारुण यांच्या दालनात बसलेले असताना, श्री. बांगड नावाचा गुत्तेदार अचानक त्या ठिकाणी आला. कोणतीही पूर्वकल्पना किंवा कारण नसताना, या गुत्तेदाराने भरत मानकर यांना उद्देशून अत्यंत अश्लील आणि अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. आमच्या कामाचे देयक रोखण्याचा प्रयत्न करणारा हा पत्रकार कोण? असे म्हणत त्याने मानकर यांना धक्काबुक्की केली. इतकेच नव्हे तर, याचे हातपाय तोडून टाकू अशी उघड धमकी देत त्यांना कार्यालयाबाहेर हाकलण्याचा प्रयत्न केला.



पत्रकार संरक्षण कायद्याचे उल्लंघन महाराष्ट्र शासनाने पत्रकारांच्या सुरक्षिततेसाठी विशेष कायदा लागू केला आहे. मात्र, शासकीय कार्यालयात अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत पत्रकाराला अशा प्रकारे धमकावले जाणे, हे या कायद्याचे सरळ उल्लंघन असल्याचे बोलले जात आहे. या घटनेमुळे जिल्ह्यातील पत्रकार वर्गातून तीव्र संताप व्यक्त होत असून, संपादक मानकर यांच्या जीविताला धोका निर्माण झाला आहे. आम आदमी पार्टी आक्रमक या घटनेची माहिती मिळताच आम आदमी पार्टीचे जालना तालुकाध्यक्ष सुभाष बोर्डे यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. त्यांनी कदीम जालना पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक यांना निवेदन सादर केले. पत्रकारितेचे कर्तव्य बजावत असताना अशा प्रकारे गुंडगिरी करणे खपवून घेतले जाणार नाही. संबंधित गुत्तेदार बांगड याच्यावर पत्रकार संरक्षण कायद्यासह अन्य कलमान्वये तात्काळ गुन्हा दाखल करावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल असा इशारा सुभाष बोर्डे (तालुकाध्यक्ष, आप, जालना) यांनी दिला आहे. संबंधित गुत्तेदार श्री. बांगड याच्यावर तात्काळ एफआयआर (ऋखठ) दाखल करावा. संपादक भरत मानकर आणि त्यांच्या दैनिकाच्या प्रतिनिधींना पोलीस संरक्षण मिळावे. शासकीय कार्यालयात पत्रकारांना धमकावणाऱ्या प्रवृत्तींवर कठोर कायदेशीर कारवाई व्हावी. या प्रकरणाचा पुढील तपास कदीम जालना पोलीस करत असून, पोलीस काय कारवाई करतात याकडे आता संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट अ‍ॅण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813